७० वर्ष

दैनिक **संध्या**

नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

सोमवार, दि. २६ जानेवारी २०२६

www.dainikesandhya.com | www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ०८ | अंक : ०३३ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रूपये

## आता ‘एआय’ लावणार मेंदूच्या आजारांचा छडा

मुंबई : अल्झायमर, पार्किन्सन्स, मेंदूतील गाठी अशा गुंतागुंतीच्या मेंदूच्या आजारांचा छडा लावण्यासाठी आता कृत्रिम प्रज्ञेचा (एआय) प्रभावी वापर होणार आहे. भारतीय तंत्रज्ञान संस्था, मुंबई ( आयआयटी मुंबई ) येथील संशोधकांनी विकसित केलेला ‘ब्रेनप्रॉट’ आणि ‘ड्रगप्रॉटएआय’ हा अत्याधुनिक स्मार्ट प्लॅटफॉर्म मेंदूविकारांच्या मुळाशी असलेल्या जैविक प्रक्रियांवर प्रकाश टाकणार असून, उपचार प्रक्रिया ठरवण्यातही महत्त्वाची भूमिका बजावणार आहे. मेंदूविकारांवरील संशोधनात प्रचंड प्रमाणात माहिती उपलब्ध असते; मात्र ही माहिती विविध ठिकाणी विखुरलेली असल्याने त्यातील परस्परसंबंध शोधणे हे संशोधकांसमोर मोठे आव्हान ठरते. याच पार्श्वभूमीवर आयआयटी मुंबईतील जैवशास्त्र व जैवअभियांत्रिकी विभागाचे प्राध्यापक संजीव श्रीवास्तव यांच्या नेतृत्वाखालील संशोधन गटाने ‘ब्रेनप्रॉट ३.०’ हे व्यासपीठ विकसित केले आहे. हे व्यासपीठ जनुके, आरएनए, प्रथिने, जैवचिन्हक आणि रुग्णनमुने यांसह मेंदूशी संबंधित विविध ‘बहु-ऑमिक्स’ माहिती एका ठिकाणी एकत्र आणते.

# अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालयाचे आज लोकार्पण संपन्न

## पिंपरी चिंचवड शहराच्या न्यायव्यवस्थेत ऐतिहासिक पर्व

**पिंपरी (दै. संध्या)**

पिंपरी चिंचवड शहराच्या न्यायालयीन इतिहासात आजचा दिवस ऐतिहासिक व अभिमानास्पद ठरला. शहराला दीर्घ प्रतीक्षेनंतर स्वतःचे हक्काचे जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय मोरवाडी येथील जुनी न्यायालयीन इमारत येथे अत्यंत सन्माननीय वातावरणात व मोठ्या उत्साहात लोकार्पण करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते झाडाच्या रोपाला पाणी घालून करण्यात आली.

या न्यायालयाचे लोकार्पण मुंबई उच्च न्यायालयाचे मा. न्यायमूर्ती श्री. संदीप मारणे साहेब व मा. न्यायमूर्ती श्री. आरिफ डॉक्टर साहेब यांच्या शुभहस्ते तर पुणे जिल्ह्याचे प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश मा. श्री. एम. के. महाजन साहेब व पिंपरी चिंचवड ॲडव्होकेट्स बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड.गौरव वाळुंज यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडले. या वेळी बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र अँड गोवाचे चेअरमन ॲड. हर्षद निंबाळकर, सदस्य ॲड. उदय वारंजीकर, ॲड. राजेंद्र उमाप, ॲड. अहमद खान पठाण, ॲड. विठ्ठल कोंडे देशमुख यांच्यासोबत बारचे माजी अध्यक्ष व पदाधिकारी त्याचबरोबर न्यायव्यवस्थेतील मान्यवर, प्रशासकीय अधिकारी, न्यायालयीन कर्मचारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पिंपरी चिंचवडसारख्या वेगाने वाढणाऱ्या औद्योगिक, व्यापारी व लोकसंख्येच्या दृष्टीने महत्त्वाच्या शहरासाठी स्वतंत्र अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालयाची आवश्यकता अनेक वर्षांपासून प्रकर्षाने जाणवत होती. आज या न्यायालयाच्या लोकार्पणामुळे शहरातील न्यायप्रक्रिया अधिक जलद, सुलभ, परिणामकारक व लोकाभिमुख होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. या सत्र न्यायालयामुळे आता नागरिकांना न्यायासाठी पुणे येथील न्यायालयांवर अवलंबून राहावे लागणार नाही. त्यामुळे वेळेची बचत, आर्थिक दिलासा आणि मानसिक ताणात घट होऊन सर्वसामान्य नागरिकांना वेळेत न्याय मिळण्यास मोठी मदत होणार आहे. तसेच वकील वर्ग व न्यायालयीन कर्मचारी यांच्यासाठीही कामकाज अधिक सुसूत्र, कार्यक्षम आणि सुव्यवस्थित होणार आहे. पिंपरी चिंचवड शहराची वाढती लोकसंख्या, झपाट्याने होणारे शहरीकरण आणि प्रकरणांची वाढती संख्या लक्षात घेता, भविष्यात स्वतंत्र मोटर वाहन न्यायालय व कौटुंबिक न्यायालय स्थापन होणे अत्यंत आवश्यक आहे. यामुळे सर्वसामान्य नागरिकांना अधिक सुलभ, जलद आणि विशेषीकृत न्याय मिळू शकेल. या गरजेचा गांभीर्याने विचार करण्यात येत असून, त्याबाबत लवकरच सकारात्मक कार्यवाही करण्यात येईल, असे मत मा. उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती श्री. संदीप मारणे यांनी व्यक्त केले.

पिंपरी चिंचवड शहर हे राज्यातील अग्रगण्य औद्योगिक शहरांपैकी एक असून येथे औद्योगिक, दिवाणी, फौजदारी तसेच श्रमविषयक प्रकरणांची संख्या सातत्याने वाढत आहे. परिणामी न्यायालयीन कामकाजावर मोठा ताण निर्माण झाला होता. या पार्श्वभूमीवर अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालयाची आज झालेली स्थापना न्यायदान प्रक्रियेला नवी गती देणारी ठरणार असून, न्यायव्यवस्थेवरील नागरिकांचा विश्वास अधिक दृढ करणारी ठरेल. मोरवाडी येथील जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालयात जिल्हा न्यायाधीश म्हणून श्रीमती एस.एस. नायर साहेब तर दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर म्हणून श्री डोंगरे साहेब यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

ही केवळ प्रशासकीय घटना नसून, पिंपरी चिंचवड शहराच्या न्यायालयीन हक्काचा विजय आहे. या न्यायालयाच्या स्थापनेसाठी सातत्याने पाठपुरावा करणारे शहरातील लोकप्रतिनिधी, पिंपरी चिंचवड ॲडव्होकेट्स बार असोसिएशनचे माजी अध्यक्ष व कार्यकारिणी सदस्य, पोलीस प्रशासन, वकील बंधू-भगिनी तसेच जागरूक नागरिक यांच्या सामूहिक प्रयत्नातूनच हा ऐतिहासिक टप्पा साकार झाला आहे. त्याचबरोबर बारचे अध्यक्ष वाळुंज यांनी शहरातील पाचही आमदारांचे त्यांनी केलेल्या सहकार्याबद्दल आभार व्यक्त केले व पुणे जिल्ह्याचे प्रमुख न्यायाधीश श्री महाजन साहेब यांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे माझे आयुक्त शेखर सिंह यांनी केलेल्या सहकार्याबद्दल विशेष कौतुक व्यक्त केले. कार्यक्रमाचे आयोजन न्यायालयीन अधिकार्यांसमवेत पिंपरी चिंचवड ॲडव्होकेट्स बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड.गौरव वाळुंज, उपाध्यक्ष ॲड. अनिल पवार, सचिव ॲड.उमेश खंदारे, महिला सचिव ॲड.रिना मगदुम, ॲड. शंकर घंगाळे, सदस्य ॲड. संकेत सरोदे, सदस्य ॲड.विकास शर्मा, ॲड. मानसी उदासी यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन न्यायाधीश महाडिक साहेब, औटी साहेब यांनी केले तर नव्याने पदभार स्विकारलेल्या जिल्हा अतिरिक्त व सत्र न्यायाधीश श्रीमती. एस.एस. नायर यांनी आभार व्यक्त केले.

# प्रलंबित प्रकरणांच्या निपटाऱ्यातून मिळतोय जलद न्याय !

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा पुढाकार

**मुंबई (दै. संध्या) :**

सर्वांसाठी न्याय.. जलद न्याय या तत्वावर राज्य शासन काम करीत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने आणि मार्गदर्शनाखाली जलद गतीने न्याय मिळण्यासाठी न्यायदान साखळीतील कमतरता दूर करण्यात येत आहे. नवीन फौजदारी कायद्याअंतर्गत जलद न्यायाला प्राधान्य दिले असून त्यानुसार न्याय सहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळेतील प्रलंबित प्रकरणांचा निपटारा करण्यात येत आहे. त्यामुळे न्यायदानाची प्रक्रिया जलद झाली आहे.



न्याय सहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय अंतर्गत असलेली प्रलंबित प्रकरणे तातडीने निकाली काढण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विशेष मोहीम राबविण्याबाबत सूचित केले. तसेच त्यांनी नियमित आढावा घेत या प्रलंबित प्रकरणांचा निपटारा करण्याची प्रक्रिया गतिमान केली. संचालनालयाकडील प्रयोगशाळांमध्ये २०२५ मध्ये एक लाख ८१ हजार प्रकरणे प्रलंबित होती. तसेच दोन लाख ९४ हजार इतकी प्रकरणे आवक झाली. संचालनालयाने विशेष मोहिम राबवून डिसेंबर २०२५ अखेर तीन लाख ९६ हजार ८७९ इतक्या प्रकरणांचा निपटारा करून ७९ हजार ५४२ इतकी प्रलंबित प्रकरणांची संख्या कमी केली आहे.

या विशेष मोहिमेअंतर्गत सर्व विभागांच्या प्रचलित मानकांमध्ये वाढ करून संचालनालयातील प्रत्येक अधिकारी, कर्मचारी यांचेकडून सकाळी ८ ते रात्री ८ या वेळेत कामाचे जादा तास वाढवून, शासकीय सुट्टीच्या दिवशी काम करून प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यात आली. संचालनालयातील कार्यरत मनुष्यबळाकडून कमीत कमी दोन लाख ते दोन लाख १५ हजार प्रकरणांचा निपटारा करण्याची क्षमता असतानाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सुचनेनुसार तीन लाख ९६ हजार ८७९ इतक्या प्रकरणांचा निपटारा करण्यात आला आहे. प्रलंबित प्रकरणांपैकी एक लाख ०२ हजार ४१३ इतक्या जास्त प्रकरणांचा निपटारा करण्यात संचालनालयाला यश आले आहे.

डिसेंबर २०२५ अखेर प्रलंबित प्रकरणांपैकी म कन्व्हेक्शनल फॉरेन्सीकफ या विभागाने तीन लाख ९६ हजार २७५ इतक्या प्रकरणांचा निपटारा केला आहे. तसेच या विभागात २७ हजार ५२४ आवक प्रकरणांची संख्या असून फेब्रुवारी २०२६ पासून ज्या दिवशी प्रकरण आवक होईल, त्याच दिवशी प्रकरणांचे विश्लेषणाचे काम सुरू होईल, त्यामुळे दिवसेंदिवस प्रकरण प्रलंबित असण्याची बाब इतिहासजमा होऊन पिडितांना जलदगतीने न्याय मिळण्याची व्यवस्था निर्माण होत आहे. संगणक गुन्हे विभाग, सायबर, ध्वनी व ध्वनीफित विभागातील प्रलंबित प्रकरणांचा निपटाराही जलदगतीने करण्यात येत आहे.

न्यायदान प्रक्रिया जलद झाल्यामुळे पीडितांना वर्षानुवर्षे न्यायासाठी प्रतीक्षा करावी लागणार नाही. गतिमान न्यायदान करण्यासाठी न्याय सहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालयाची महत्त्वाची भूमिका आहे. त्यामुळेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संचालनालयाला अधिक सक्षम करण्यावर भर दिला आहे. राज्यातील प्रत्येक उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालयाला मोबाईल फॉरेन्सिक व्हॅन उपलब्ध करून देण्यात येत आहे.

## बालकांच्या सुरक्षेच्या अनुषंगाने कायदा अंतिम टप्प्यात

# बदलापूर घटनेच्या अनुषंगाने डॉ. नीलम गो-हे यांनी सत्वर दखल घेतल्याबद्दल मानले शासनाचे आभार

**मुंबई (दै. संध्या) :**

बदलापूर येथे घडलेल्या दुर्दैवी घटनेच्या पार्श्वभूमीवर बालकांच्या सुरक्षेसंदर्भात उपसभापती विधानपरिषद डॉ नीलम गो-हे यांचेमार्फत करण्यात आलेल्या निवेदनाची दखल उपमुख्यमंत्री कार्यालयाने घेतली असून, या अनुषंगाने महत्त्वाची माहिती देण्यात आली आहे.उपमुख्यमंत्री कार्यालयाकडून कळविण्यात आले आहे की, प्रारंभिक बालसंगोपन व शिक्षण केंद्रे तसेच पूर्वप्राथमिक शाळा व अंगणवाड्यांमधील बालकांच्या सुरक्षेसाठी स्वतंत्र कायद्याचा मसुदा



शिक्षण विभागाने अंतिम केला आहे. सदर मसुद्यास महिला व बालविकास विभाग तसेच विधी व न्याय विभागाची मान्यता मिळाल्यानंतर तो विधानमंडळात सादर करण्यात येणार आहे.या कायद्यामध्ये शून्य ते सहा वयोगटातील बालकांच्या सुरक्षेसंदर्भात ठोस तरतुदी, संबंधित आस्थापनांची स्पष्ट व्याख्या, त्यांच्यावर नियंत्रण ठेवण्याची यंत्रणा तसेच प्रशासकीय जबाबदारी निश्चित करण्याबाबत तरतुदी असणार असल्याचे संकेत देण्यात आले आहेत.

बालकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असलेल्या या कायद्याबाबत सकारात्मक पावले उचलल्याबद्दल राज्य शासनाचे त्यांनी आभार व्यक्त केले आहेत.तसेच, कायदा अस्तित्व-ात येईपर्यंत तात्पुरत्या पण कठोर प्रशासकीय उपाययोजना प्रभावीपणे राबविण्याची आवश्यकता त्यांनी अधोरेखित केली आहे.

# प्रजासत्ताक दिनानिमित्त महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीला आकर्षक विद्युत रोषणाई

**पिंपरी (दै. संध्या) :**

देशाचा प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा होत असताना पिंपरी चिंचवड महानगरपालिका मुख्य प्रशासकीय इमारत २६ जानेवारीच्या पूर्वसंध्येला आकर्षक विद्युत रोषणाईने उजळून निघाली. तिरंगा रंगसंगतीतील दिव्यांच्या सजावटीमुळे संपूर्ण इमारत लक्षवेधी आणि राष्ट्रभक्तीचा संदेश देणारी दिसून येत आहे.



इमारतीच्या दर्शनी भागावर तसेच सभोवतालच्या परिसरात हिरवा, पांढरा आणि केशरी रंगातील एलईडी दिव्यांची भव्य मांडणी करण्यात आली आहे, ज्यामुळे परिसर अधिकच तेजस्वी व प्रेरणादायी झाला आहे. या रोषणाईमुळे नागरिकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून अनेक नागरिक इमारतीसमोर थांबून छायाचित्रे काढत आहेत. महानगरपालिकेच्या या उपक्रमाचे नागरिकांकडून स्वागत करण्यात येत आहे.

प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने शहरात विविध ठिकाणी देशभक्तीपर कार्यक्रम, ध्वजारोहण आणि सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

महानगरपालिकेच्या या रोषणाईमुळे पिंपरी-चिंचवड शहरात प्रजासत्ताक दिनाचा उत्सव अधिकच दिमाखात साजरा होत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.



# संपादकीय

## माणसातली माणुसकी

आजचा माणूस प्रचंड वेगात धावत आहे. स्पर्धा, यश, पैसा, प्रतिष्ठा, सत्ता-या सगळ्यांच्या शर्यतीत तो इतका गुंतला आहे की वाटेत कुठेतरी माणूस म्हणून थांबायचं विसरतोय. तंत्रज्ञान प्रगत झालं, सुविधा वाढल्या, आयुष्य झपाट्याने बदललं; पण या सगळ्या प्रगतीत माणसातली माणूसकी मात्र हळूहळू गळून पडते आहे का, असा प्रश्न वारंवार पडतो.

माणूसकी म्हणजे नेमकं काय?

माणूसकी म्हणजे दुसऱ्याच्या दु:खाशी जोडून घेण्याची संवेदना. समोरचा माणूस आपल्यासारखाच आहे, त्यालाही भावना आहेत, वेदना आहेत, स्वप्नं आहेत-ही जाणीव. कुणी पडत असेल तर हात देणं, कुणी रडत असेल तर त्याच्या खांद्यावर हात ठेवणं, कुणी चुकत असेल तर त्याला सुधारण्याची संधी देणं, आणि कुणी बरोबर असेल तर त्याचं मनापासून कौतुक करणं-हे सगळं म्हणजे माणूसकी.

आज मात्र समाजात चित्र वेगळंच दिसतं. अपघातात पडलेला माणूस मदतीची याचना करत असतो, पण अनेकजण मोबाईल काढून व्हिडिओ काढण्यात व्यस्त असतात. सोशल मीडियावर संवेदना दाखवायला हजारो पोस्ट्स होतात, पण प्रत्यक्षात शेजाऱ्याच्या अडचणींकडे पाहायला वेळ नसतो. माझं काय? या विचाराने आपलं काय? हा प्रश्न मागे पडतो आहे.

माणूसकी हरवण्यामागे कारणं अनेक आहेत. वाढती स्पर्धा माणसाला आत्मकेंद्री बनवत आहे. शिक्षणात गुण महत्त्वाचे झाले, पण मूल्यं दुय्यम ठरली. नात्यांमध्ये संवाद कमी झाला, अपेक्षा वाढल्या. माणूस यशस्वी होण्याच्या धडपडीत इतका एकटा पडतो की त्याला दुसऱ्याच्या वेदना दिसेनाशा होतात. संवेदना बोथट होतात, मन कठीण होतं. पण तरीही, सगळं अंधारमय आहे असं नाही. अजूनही कुठेतरी माणूसकी जिवंत आहे. पूर, भूकंप, महामारी यांसारख्या संकटांच्या वेळी अनोळखी लोक एकमेकांसाठी धावून येतात. कुणी रक्तदान करतं, कुणी अन्न वाटतं, कुणी निस्वार्थपणे सेवा करतं. या क्षणांत जाणवतं-माणूसकी संपलेली नाही, ती फक्त दडलेली आहे.

खरंतर माणूसकी मोठ्या गोष्टींमध्ये नसते; ती छोट्या कृतींमध्ये असते. बसमध्ये वयोवृद्धाला जागा देण्यात, कामवालीला आदराने बोलण्यात, रस्त्यावरच्या प्राण्याला पाणी देण्यात, चुकलेल्या माणसाला माफ करण्यात-इथंच खरी माणूसकी दिसते. माणूस मोठा होतो तो संपत्तीने नाही, तर संवेदनशीलतेने.

आज गरज आहे ती माणूसकी जाणीवपूर्वक जपण्याची. मुलांना फक्त करिअरच नाही, तर सहानुभूती शिकवण्याची. शाळा, कुटुंब, समाज-सगळ्यांनी मिळून चांगला माणूस घडवण्यावर भर देण्याची. कायदे, नियम महत्त्वाचेच आहेत, पण त्यापेक्षा महत्त्वाचं आहे अंत:करण जागं असणं.

शेवटी एक साधा प्रश्न स्वत:लाच विचारायला हवा-

मी माणूस म्हणून जगतोय का, की फक्त स्वत:साठी जगणारी यंत्रणा बनलोय?

जर या प्रश्नाचं उत्तर प्रामाणिकपणे देता आलं, तर माणसातली माणूसकी पुन्हा उजळू लागेल. कारण जगाला अजून एक यशस्वी माणूस नको आहे, जगाला माणूसकी जपणारा माणूस हवा आहे.

## सुविचार

ज्याच्याजवळ पुस्तक आहे तो एकटा नाही.

– अज्ञात




## गुरु वचन

### बाळगा सकारात्मक दृष्टिकोन

प्रगतीसाठी मत्सर नव्हे, प्रेरणेची गरज

मत्सर करणारा माणूस प्रगती करण्याऐवजी इतरांच्या प्रगतीत अडथळे उत्पन्न करीत असतो. असा माणूस मानसिक कुरापतीमुळे स्वत: महत्त्वकांक्षी नसतोच उलट स्वत:च्या व इतरांच्या प्रगतीतील अडसर असतो. त्याची विकृत व संकुचित मानसिकता म्हणत असते कि, मी बसलो आहे तर तूही पुढे जाऊ नकोस. पुढे जाण्यासाठी, प्रगती करण्यासाठीही मत्सराची नव्हे तर प्रेरणेची गरज असते. एखाद्याला एखादी गोष्ट उत्तमरित्या करताना पाहून त्यापासून प्रेरित होणे व त्यांचे अनुकरण करणे माणसाला झुंजार व प्रगतिशील बनवते. तसेच स्पर्धेची भावना पुढे जाण्यास मदत करते. प्रत्येक यशस्वी व्यक्तिने कोणाकडून तरी प्रेरित होऊन व त्याच्या गुणांचे अनुकरण करूनच यश संपादन केलेले असते. कोणाचा मत्सर करून नव्हे. मत्सरामुळे तर आपले भविष्य व करियर दोन्हीही नष्ट होते. म्हणूनच मत्सर जाळून प्रेरणा पाळायला, जोपासणे आवश्यक आहे.

## उपदेशकथा

### ईश्वरदर्शनाची आस

समुद्रामध्ये कालव नावाचा शिंपल्यात राहणारा एक प्राणी असतो. एक कालव त्याच्या मित्र कालवाला म्हणाला, 'अरे, काय सांगू? माझ्या अंतरंगामध्ये एक मोठे दु:ख आहे. ते जड आहे व वाटोळे व तेजस्वी आहे. पण त्यामुळे मी अगदी हैराण झालो आहे. 'दुसरा कालव अंतरंगामध्ये मोकळा होता. तो म्हणाला, 'माझ्याकडे बघ. मला आतील वेदना नाही. म्हणून मी आपला सुखी आहे.' एका देवदूताने हे संभाषण ऐकले. तेव्हा तो म्हणाला, 'येथून तेथे जीवप्राणी सर्व सारखेच. प्रत्येकाच्या अंतरी ईश्वरदर्शनाचे मोती निर्माण करण्याची क्षमता नसते. जे भाग्यवान असतात त्यांच्या अंतरी ते तयार होते. पण त्यासाठी वेदना सोसावी लागते.'

कथा उपदेश : संतांच्या जीवनाला हा नियम प्रकर्षाने लागू पडतो. जुने वितळून टाकण्यास मानसिक कष्ट सोसावे लागतात.

## पंचांग

| | |
|---|---|
| २६ जानेवारी २०२५ | चन्द्र:मेष१३:३५:३१ |
| सोमवार | हिजरी सन् – १४४६ |
| विक्रम संवत्– २०८२ | मुस्लिम मास – शाबान |
| माघ शके संवत्– १९४७ | तारीख – |
| संवत्सर – विश्वावसूनाम | |
| अयन– उत्तरायणारंभ | **विशेष** |
| मास– माघ | भानुसप्तमी |
| ऋतु– हेमंत | महर्षि नवळ जयंती |
| शुक्ल पक्ष | – जळगाव |
| तिथि:सप्तमी २३:१०:३४ | रथसप्तमी |
| नक्षत्र:रेवती १३:३५:३१ | कश्यपाचार्यस्वामी जयंती |
| योग:सिद्ध ११:४५:१८ | – रागुरूनगर (पुणे) |
| करण:गर ११:५८:१८ | नानाजी महाराज दही |
| करण:वणिज २३:१०:३४ | हंडी यात्रा – कापशी |
| सूर्य:मकर | (वर्धा) |

## दै.'संध्या'धमाल सूडोकु क्र. ८४३

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 8 | | 9 | | 7 | | 2 | |
| 3 | 7 | | | | | 4 | | |
| 4 | | 9 | 2 | | 8 | | 1 | 5 |
| | | 3 | 1 | 5 | 9 | | | |
| | 5 | | | | | | 4 | |
| | | | 4 | 8 | 2 | 1 | | |
| 8 | 2 | | 7 | | 3 | 6 | | 4 |
| | | 6 | | | | | 7 | 1 |
| | 1 | | 6 | | 5 | | 3 | |

### : सूडोकु :

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३-३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

### सूडोकु क्र. ८४२ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2 | 4 | 9 | 8 | 6 | 5 | 7 | 3 | 1 |
| 6 | 3 | 7 | 9 | 2 | 1 | 4 | 5 | 8 |
| 1 | 8 | 5 | 3 | 7 | 4 | 2 | 9 | 6 |
| 4 | 7 | 1 | 6 | 5 | 9 | 8 | 2 | 3 |
| 8 | 9 | 6 | 1 | 3 | 2 | 5 | 7 | 4 |
| 5 | 2 | 3 | 4 | 8 | 7 | 6 | 1 | 9 |
| 3 | 5 | 8 | 7 | 9 | 6 | 1 | 4 | 2 |
| 7 | 6 | 4 | 2 | 1 | 3 | 9 | 8 | 5 |
| 9 | 1 | 2 | 5 | 4 | 8 | 3 | 6 | 7 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- ८२७ – ग्रेगोरी चौथा पोपपदी. याच दिवशी ई.स. ८४४ मध्ये तो मृत्यु पावला.
- १३२७ – एडवर्ड तिसरा इंग्लंडच्या राजेपदी.
- १४९४ – आल्फोन्सो दुसरा नेपल्सच्या राजेपदी.
- १५३३ – हेन्री आठव्याने ॲन बोलेनशी गुप्ततेत लग्न केले.
- १५५४ – ब्राझिलमध्ये साओ पाउलो शहराची साओ पाउलो दोस कॅम्पोस दि पिरातिनिन्गा या नावाने स्थापना झाली.
- १७५५ – मॉस्कॉ विद्यापीठाची स्थापना झाली.
- १८८१ – थॉमस अल्वा एडिसन व अलेक्झांडर ग्रॅहाम बेलनी ओरियेंटल टेलिफोन कंपनी सुरू केली.
- १९१७ – डेन्मार्कने वेस्ट ईंडिझमधील आपले प्रदेश अमेरिकेला २५,००,००० अमेरिकन डॉलरला विकली.
- १९१९ – लीग ऑफ नेशन्सची स्थापना.
- १९२४ – फ्रांसच्या शामोनि शहरात पहिले हिवाळी ऑलिंपिक खेळ सुरू.
- १९४२ – दुसरे महायुद्ध – थायलंडने युनायटेड किंग्डम व अमेरिके विरूद्ध युद्ध पुकारले.
- १९४९ – डेव्हिड बेन गुरियन इस्रायेलच्या पंतप्रधानपदी.
- १९५५ – रशियाने जर्मनी विरूद्धचे युद्ध अधिकृतरित्या संपल्याची घोषणा केली.
- १९६९ – अमेरिका व उत्तर व्हियेतनाम दरम्यान पॅरिसमध्ये तहाची बोलणी सुरू.
- १९७१ – हिमाचल प्रदेशला भारताचे १८वे राज्य म्हणून मान्यता.
- १९७१ – युगांडात इदी अमीन ने मिल्टन ओबोटेला पदच्युत केले व स्वत-ला अध्यक्ष घोषित केले.
- १९९९ – पश्चिम कोलंबियात भूकंप. १,००० ठार.
- २००७ – मेक्सिकोत बस अपघातात २७ ठार, २० जखमी.
- २००८ – पाकिस्तानने ७०० किलोमीटर मारक क्षमता असलेल्या मध्यम पल्ल्याच्या 'शाहीन-१ हत्फ चार' बॅलिस्टिक क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी घेतली.

### राष्ट्रीय

- २००७ – मुंबईत गांधीजींच्या दुर्मिळ छायाचित्रांची ६८ लाख रुपयात विक्री.

### जन्म

- १६२७ – रॉबर्ट बॉईल, स्कॉटलंडचा रसायनशास्त्रज्ञ यांचा जन्म.

## जोक

निलेश : (रागाने) माझ्या मिसळमध्ये हा पहा मेलेला डास.

वेटर : बरोबर आहे साहेब. पाच रुपयात हत्ती कसा येईल?

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | २५.९ | १७.२ |
| अहमदनगर | २५.६ | १४.२ |
| अकोला | २८.६ | १७.४ |
| अमरावती | २७.८ | १७.१ |
| बीड | २९ | १८.२ |
| भंडारा | २८.५ | १६ |
| बुलढाणा | १६ | ११.९ |
| चंद्रपूर | २८.३ | १८.१ |
| चेन्नई | २८.८ | २१.३ |
| नवी दिल्ली | १७.२ | १२.७ |
| धुळे | २८.७ | १८.३ |
| गोंदिया | २७.५ | १७.१ |
| जळगाव | २८.३ | १६.९ |
| कोल्हापूर | २६.८ | १५.३ |
| लातूर | २७.१ | १७.३ |
| मुंबई | २८.४ | २२.६ |
| नागपूर | २७.६ | १८ |
| नांदेड | २७.७ | १८.३ |
| नंदूरबार | २६ | १८.२ |
| नाशिक | २७.३ | १४.३ |
| पुणे | २६.५ | १२.४ |
| पंढरपूर | २७.३ | १८ |
| सातारा | २७ | ९.६ |
| सांगली | २७.२ | १४.७ |
| सोलापूर | २७.७ | १७.७ |
| वर्धा | २८.४ | १७.८ |
| वाशिम | २६.९ | १७.७ |
| यवतमाळ | २७.६ | १७.९ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** सतत पाहुण्यांची वर्दळ राहील. आपली इच्छापूर्ती होणाऱ्या घटना घडतील.

**तुळ :** कामानिमित्त प्रवास घडून येतील. नवीन कार्यारंभ होतील. नव्या ओळखी होतील व त्या फायदेशीर ठरतील.

**वृषभ :** मित्रपरिवाराबरोबर वेळ मजेत घालवाल. कुटुंबात आपल्या मतांचा आदर केला जाईल. अडचणींवर सहजपणे मात कराल.

**वृश्चिक :** सुग्रस भोजनाचे बेत आखले जातील. मताचा समाजात आदर होईल. कतृत्वाला झळाळी येणाऱ्या घटना घडतील.

**मिथुन :** प्रवासातून कार्यसिद्धी होईल. कौटुंबिक सौख्य लाभेल. स्थावर मालमत्तेच्या व्यवहारातून लाभ होतील. महिला गृह सजावट करतील.

**धनु :** मोठया यशासाठी प्रयत्न करावे लागतील. यशस्वी होण्यासाठी इतरांवर अवलंबून राहू नका. कुटुंबात आनंदी वातावरण राहील.

**कर्क :** धार्मिक स्थळांना भेटी द्याल. बौद्धीक व कला क्षेत्रातून चांगला फायदा होईल. घरात धार्मिक शुभसमारंभाचे आयोजन केले जाईल.

**मकर :** नवनवीन कल्पना आकार घेतील. जुनी थकेलेली येणी वसूल होतील. उपासना मार्गातील लोकांना चांगली अनुभूती मिळेल.


**सिंह :** ईश्वरावर श्रद्धा ठेवावी. आपल्या बुद्धीमत्तेचा उपयोग करुन चांगले अर्थाजन करता येईल. कौटुंबिक सौख्य मिळाल्याने समाधान लाभेल.

**कुंभ :** विवाहेच्छूक तरुणांचे विवाह ठरतील. अनोळखी व्यक्तींच्या ओळखीतून कामात नुकसान संभवते. रागाचा पारा उंचावेल.

**कन्या :** समाजात व कुटुंबात आपल्या मतांचा योग्य आदर केला जाईल. नवीन नोकरीच्या शोधात असणाऱ्या तरुणांना सुसंधी लाभतील.

**मीन :** आशावादी धोरणाचा अवलंब केलात तर आपले ध्येय गाठणे शक्य होईल. व्यवसायातील रेंगाळलेली कामे मार्गी लावता येतील.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. ८४४



आडवे शब्द

आडवे शब्द

१. अचूक उपाय (ला.)
४. दोघे
७. परीक्षा करण्यात नापास!
११. अपेक्षित वेळेनंतर
१२. धार लाव!
१३. अटीची भाषा
१४. मनात उठणारे वादळ
१५. आपल्या डोक्यावरची निळी छत्री
१८. खोडसाळ, वात्रट
२०. पिकाचा गाळ
२२. प्राण्यांसाठी एक ज्ञानेंद्रियच
२३. वेगळाच इतिहास रचणाऱ्या बिहारच्या माजी मुख्यमंत्री
२४. अस्वल
२५. अल्प
२७. 'जैसे थे' परिस्थिती
२९. मरेपर्यंत
३१अ. दबाव
३२. लहान
३३. संगीतातील एक राग
३५. हार, सर
३६. वस्ती
३८. भांडणाची कळ
३९. कलावंत
४१. देशाचे नाणे
४२. आजूबाजूच्या परिस्थितीप्रमाणे रंग बदलणारा
४३. मार्गक्रमण
४५. त्वरेने, तत्परतेने
४७. नूतन
४८. नाश पावणारे
५०. आवाजाची गोंधळ
५१. विशेष
५३. मोत्याची पैदास करणारा प्राणी
५४. पुन्हा पुन्हा
५७. बाई
५८. मद्य
६०. जुगाराचा एक प्रकार
६१. थेट, सरळ
६३. शुष्कता, तीव्र ऊन
६४. शहाणा, सुंदर
६७. वडील
६९. राख
७२. व्याकूळ, घाबरलेला
७४. पेढ्याचा एक प्रकार
७५. कणीदार
७६. विखारी चेष्टा
७७. शिक्षा

उभे शब्द

१. श्रीमंत बाजीराव पेशवे यांचे घरगुती संबोधन
२. शाहिरी मराठीत 'माझ्याबरोबर'
३. नेमका तपशील
४. छाती
५. देवाचे असेल तर ठीक!
६. लकेर
७. समुद्रातील लाटांचा आवाज
८. भरजरी
९. रममाण, निमग्न
१०. कबूतर
१२. एक पंजाबी नाव
१६. ऐन
१७. चिडवण्यासाठी केलेले कृत्य
१९. सर्वस्व
२१. लेखक मतकरींचे नाव
२४अ. फळांचे पेय
२५. दोस्त
२६. शरीर
२८. पाताळ
२९. शिव्याशाप
३०. अंकित माणूस, गुप्तहेर
३१. शक्ती, जोर, बळ
३१अ. लाही-लाही
३३. हिमालयातील पांडवकालीन सरोवर
३४. वेडावाकडा
३५. खाणाखुणांवरून पाठलाग
३७. उंट हाकणारा
४०. पापडाच्या पिठाची गोळी
४१. हालचाल
४४. पृष्ठभागावरील निघालेला छोटा तुकडा
४५. पटापटा
४६. '--- काय अन् फाटक्यात पाय!'
४९. पाठविलेला
५०. ऋणको, कर्ज घेणारा
५१. फुकटचंबूमुळे पदराला लागणारा लोणच्यातील मसाला
५२. सदोदित
५५. वर्तमानपत्रातील कप्पा
५६. वेतन
५९. न केलेल्या गोष्टींचा पाश्चाताप
६०. महिरप
६२. पशूंचे ओरडणे
६५. विष
६६. सजावट
६७. विहीर
६८. माहूताकडील शस्त्र
७०. मीठ
७१. पलंग, बाज
७३. वाजवण्याची पेटी, फजितीचे वाद्य

### जम्बो शब्दकोडे क्र. ८४३ चे उत्तर

आडवे उत्तर : १.छाना २अ.बेभान ५.पथकर ८.वसवस ११.कट १२.जरतर १४.सामानसुमान १५.टाकला १७.लकवा १९.रास २१.लवाद २३.वारदार २४.मांजर २५.अस्त २६.सरकार २८.नीरजा ३१.मस ३३.समरस ३४.खत ३५.सारजा ३६.समाचार ३७.वात ३८.कलह ४०.नशा ४२.दाढी ४३.नवरस ४५.वातड ४६.किन्नर ४७.पीर ४८.नाक ४९.मौज ५०.खानसामा ५३.कलकल ५४.मानधन ५६.खनन ५८.तनया ६०.दादर ६२.रदन ६४.तगडा ६७.रया ६८.वानर ७०.अनारकली ७२.वाजतगाजत ७४.तीखा ७५.वासरू ७७.सजा ७८.गजरा ८०.नाद ८२.सरळसोट ८३.मनकवडा ८४.तर्री

उभे उत्तर १.छाकटा २.नरम ३.भाजणी ४.नर ५.परकर ६.कसा ७.रमावर ८.वसुधा ९.समा १०.वनराज १३.तलवार १६.ताल १८.वासर २०.सरबत २२.वास २४.मांजा २५.अचानक २७.कास २८.नीरद २९.रस ३०.वसाहत ३२.कमालकिमान ३३.सरदार ३४.खतरनाक ३७.वाव ३९.लवाजमा ४१.शासन ४३.नरकयातना ४४.सकल ५०.खानदान ५१.साखर ५२.पतन ५५.नफा ५७.नर ५९.अरण्यवास ६१.दरवाजा ६३.दहेज ६५.गरती ६६.डाकखाना ६९.मतदान ७१.वारूळ ७३.तगडा ७६.सर ७७.सट ७९.रात ८१.दरी

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे-४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे - ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०-२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

# राष्ट्रीय मतदार दिन पुणे जिल्हाधिकारी कार्यालयात संपन्न

## लोकशाही दैनंदिन आचरणातून जिवंत राहते : अपर जिल्हाधिकारी सतीश राऊत

**पुणे (दै. संध्या) :**

पुणे : लोकशाही ही केवळ राज्यघटनेतील संकल्पना नसून ती प्रत्येक नागरिकाच्या दैनंदिन आचरणातून जिवंत राहते. मतदानाचा अधिकार हा केवळ हक्क नसून तो प्रत्येक नागरिकाचे महत्त्वाचे कर्तव्य आहे. युवकांनी विशेषतः मतदान प्रक्रियेत सक्रिय सहभाग घ्यावा, लोकशाही मूल्यांची जपणूक करावी आणि संविधानाने दिलेल्या स्वातंत्र्याची जबाबदारीने कदर करावी, असे आवाहन अपर जिल्हाधिकारी सतीश राऊत यांनी केले.

पुणे जिल्हाधिकारी कार्यालयातील बहुउद्देशीय सभागृहात आयोजित कार्यक्रमात मतदार नोंदणी व निवडणूक प्रक्रियेत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी उपजिल्हा निवडणूक अधिकारी मीनल कळसकर, प्रमुख पाहुणे मेजर अर्चिस सबनीस, विंग कमांडर वैष्णवी टोकेकर यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी ज्ञउत्कृष्ट मतदार नोंदणी अधिकारी – २०२६फहा पुरस्कार पिंपरी विधानसभा मतदारसंघातील श्रीमती अर्चना यादव-पोळ यांना प्रदान करण्यात आला. तसेच ज्ञउत्कृष्ट सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारीफ म्हणून जुन्नर विधानसभा मतदारसंघातील श्री. सुनील शेळके यांचा सन्मान करण्यात आला. निवडणूक नायब तहसीलदार प्रवर्गात आंबेगाव येथील श्री. सचिन वाघ आणि शिवाजीनगर येथील श्रीमती सायली धस यांना पुरस्कार देण्यात आला, तर निवडणूक लिपीक प्रवर्गात शिवाजीनगर येथील श्रीमती अर्चना सानप यांना गौरविण्यात आले.




मतदारसंघनिहाय उत्कृष्ट पर्यवेक्षक पुरस्कारही यावेळी प्रदान करण्यात आले. यामध्ये जुन्नर येथील श्री. राजेंद्र अडसरे, आंबेगावचे श्री. सागर सूर्यकांत गुरव, खेडचे श्री. अनिल बोऱ्हाडे, शिरूरचे श्री. एकनाथ देवीचंद ओव्हाळ, इंदापूरचे श्री. लक्ष्मीकांत शिवाजी मुळे, बारामतीचे श्री. संतोष रामचंद्र नलवडे, पुरंदरच्या श्रीमती अरूणा दत्तात्रय खेडेकर, भोरचे श्री. युनूस अब्दुल शेख, भोर-मुळशीचे श्री. लवा बाबा गायकवाड, मावळच्या सौ. एम. एफ. खान, चिंचवडचे श्री. महेंद्र ज्ञानोबा पवार, पिंपरीचे श्री. राजेंद्र रामचंद्र कांगुडे, भोसरीच्या श्रीमती मंगल जाधव, वडगावशेरीच्या श्रीमती सोनल मंगेश बोऱ्हाडे, शिवाजीनगरच्या श्रीमती लता दामसे, कोथरुडचे श्री. दीपक कंधारे, खडकवासल्याचे श्री. रवी फनसे, पर्वतीच्या श्रीमती स्नेहल श्याम साखरे, हडपसरचे श्री. अजय सिन्नरकर, पुणे कॅन्टोन्मेंटचे डॉ. मोहम्मद जमीर अहमद चाँद शेख आणि कसबा पेठ मतदारसंघातील श्री. सौरभ मोरे यांचा समावेश होता. याशिवाय उत्कृष्ट मतदार केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) म्हणून जुन्नरचे श्री. कैलास दाभाडे, आंबेगावचे श्री. अर्जुन रामचंद्र झोडगे, खेडचे श्री. दिनेश धाकडे, शिरूरचे श्री. सचिन दिलीप कारकुड, दौंडचे श्री. सुधीर पोपट बोत्रे, इंदापूरचे श्री. मुरलीधर धनंजय माने, बारामतीचे श्री. विजय तुकाराम चव्हाण, पुरंदरचे श्री. आदिनाथ भागवत, भोरचे श्री. सूर्यकांत काशिनाथ बारवकर, भोर-मुळशीचे श्री. मयुर बाळासाहेब कळमकर, मावळचे श्री. महादेव शेलार, चिंचवडचे श्री. अनिल नारायण सुकाळे, पिंपरीचे श्री. सुधीर मारुती खाडे, भोसरीच्या श्रीमती रजनी दळवी, वडगावशेरीचे श्री. रविंद्र देवराम गारे, शिवाजीनगरचे श्री. रामदास गवारी, कोथरुडचे श्री. धर्मराज आंग्रे, खडकवासल्याचे श्री. गणेश कारले, पर्वतीच्या श्रीमती अर्चना प्रशांत मोरे, हडपसरच्या श्रीमती रेश्मा ढमढेरे, पुणे कॅन्टोन्मेंटच्या श्रीमती बिंदू नायर आणि कसबा पेठच्या श्रीमती चित्रा पवार यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या वेळी मतदार जनजागृतीसाठी उपस्थितांना मतदार प्रतिज्ञा देण्यात आली. तसेच वासुदेव आसाराम कसबे यांनी सादर केलेले मतदार जनजागृती गीत उपस्थितांच्या मनाला भिडले.

यावेळी प्रमुख पाहुणे मेजर अर्चिस सबनीस, विंग कमांडर वैष्णवी टोकेकर यांनीही लोकशाही मध्ये मतदाराच्या महत्व विशद केले. उपजिल्हा निवडणूक अधिकारी मीनल कळसकर यांनी राष्ट्रीय मतदार दिन का केला जातो याचे महत्व आपल्या प्रास्ताविकात विशद केले.

### राष्ट्रीय मतदार दिना निमित्त चित्र प्रदर्शन

भारतीय लोकशाही मध्ये मतदाराचे महत्व विशद करणारे अत्यंत सुंदर असे प्रदर्शन जिल्हाधिकारी कार्यालयाच्या तळ मजल्या वरील विस्तृत अशा जागेत लावले आहे. आज राष्ट्रीय मतदार दिनाच्या कार्यक्रमाला आलेल्या नवमतदार युवक, युवतीनीं हे प्रदर्शन पाहिले... आपले मतदान किती अमूल्य आहे याची जाणीव झाल्याच्या प्रतिक्रिया त्यांनी दिल्या.

## थोडक्यात पण महत्वाचे...

### प्रजासत्ताक दिनानिमित्त महाराष्ट्राच्या राज्यपालांचे कार्यक्रम

मुंबई : ७७ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त महाराष्ट्र व गुजरातचे राज्यपाल आचार्य देवव्रत यांचा राज्यातील जनतेला उद्देशून संदेश उद्या, दिनांक २६ जानेवारी रोजी सकाळी ८.३० वाजता दूरदर्शन सह्याद्री वहिनी वरुन प्रसारित केला जाईल. आकाशवाणी (अस्मिता वाहिनी) वरुन वर हा संदेश सकाळी ९.०० प्रसारित केला जाईल.

मा. राज्यपालांचे आमंत्रितांसाठी प्रजासत्ताक दिन स्वागत समारंभाचे आयोजन उद्या दि. २६ सायंकाळी ५.०० वाजता लोक भवन, मुंबई येथे करण्यात आले आहे. हा समारंभ फक्त निमंत्रितांसाठीच आहे.

### भारत निवडणूक आयोगाच्या ईसीआयनेट डिजिटल प्लॅटफॉर्मचे उद्घाटन

मुंबई : भारत निवडणूक आयोगाने इंडिया इंटरनॅशनल कॉन्फरन्स ऑन डेमोक्रसी अँड इलेक्शन मॅनेजमेंट (आयआयसीडीईएम)-२०२६ दरम्यान ज्ञईसीआयनेट (ईसीआयएनईटी)फ या एकात्मिक डिजिटल प्लॅटफॉर्मचे उद्घाटन केले. २१ ते २३ जानेवारी २०२६ दरम्यान भरत मंडपम, नवी दिल्ली येथे ही तीन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषद आयोजित करण्यात आली आहे.

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या संकल्पनेतून, तसेच निवडणूक आयुक्त डॉ. सुखबीर सिंग संधू आणि डॉ. विवेक जोशी यांच्या सहकार्याने ज्ञईसीआयनेटफची निर्मिती करण्यात आली असून, त्याची विकासाची घोषणा मे २०२५ मध्ये करण्यात आली होती.

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी सांगितले की, हा प्लॅटफॉर्म कायद्याच्या चौकटीत विकसित करण्यात आला असून तो २२ अनुसूचित भाषा आणि इंग्रजीत उपलब्ध आहे. जगभरातील निवडणूक व्यवस्थापन संस्थांनी त्यांच्या देशांतर्गत कायदे व स्थानिक भाषांनुसार अशाच डिजिटल प्लॅटफॉर्मच्या विकासासाठी भारतासोबत सहकार्य करावे, असे आवाहनही त्यांनी केले.

निवडणूक आयुक्त डॉ. सुखबीर सिंग संधू यांनी ईसीआयनेटमुळे निवडणूक प्रक्रियेत पारदर्शकता वाढून निवडणूक संस्थांवरील विश्वास दृढ होईल, तसेच कार्यपद्धतीवर प्रभावी देखरेख, जलद निर्णयप्रक्रिया आणि माहितीचा वेगवान प्रसार शक्य होईल, असे नमूद केले. तर डॉ. विवेक जोशी यांनी या परिषदेमुळे तंत्रज्ञान आणि डिजिटल नवकल्पनांच्या वापराबाबत जागतिक सर्वोत्तम पद्धती जाणून घेण्याची संधी निवडणूक संस्थांना मिळणार असल्याचे सांगितले.

माहिती तंत्रज्ञान विभागाच्या महासंचालक डॉ.सीमा खन्ना यांनी सादरीकरणात सायबर सुरक्षेला ईसीआयनेट मुख्य आधारस्तंभ असल्याचे स्पष्ट केले. आज तंत्रज्ञान केवळ सहाय्यक भूमिका बजावत नसून, ते धोरणात्मक सक्षमक बनले असल्याचे त्यांनी सांगितले. ज्ञईसीआयनेटफमुळे निवडणुकांमध्ये पारदर्शकता, कार्यक्षमता, विश्वासार्हता आणि जनतेचा विश्वास वाढेल, असेही त्यांनी नमूद केले.

ईसीआयनेट हा जगातील सर्वात मोठा निवडणूक सेवा प्लॅटफॉर्म असून, भारतासारख्या जगातील सर्वात मोठ्या लोकशाहीतील निवडणूक आयोगाच्या ४० हून अधिक ॲप्स आणि पोर्टल्सचे एकत्रीकरण यात करण्यात आले आहे. भारतीय संविधान, लोकप्रतिनिधी अधिनियम १९५० व १९५१, मतदार नोंदणी नियम १९६० आणि निवडणूक आचार नियम १९६१ यांच्याशी पूर्ण सुसंगततेने हा प्लॅटफॉर्म विकसित करण्यात आला आहे.

### राष्ट्रीय वीर गाथा ५.० मध्ये महाराष्ट्र अव्वल; देशातील सुपर १०० मध्ये सर्वाधिक १९ विजेते महाराष्ट्राचे

नवी दिल्ली : भारतीय प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून संरक्षण मंत्रालय, शिक्षण मंत्रालय आणि मायगव्ह यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या मप्रोजेक्ट वीर गाथा ५.०फ या राष्ट्रीय स्पर्धेचा निकाल जाहीर झाला आहे. या प्रतिष्ठेच्या स्पर्धेत महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांनी अभूतपूर्व यश संपादन केले असून, देशातील मसुपर १००फविजेत्यांमध्ये सर्वाधिक १९ विजेते महाराष्ट्राचे आहेत. या विजेत्यांमध्ये १४ मुली आणि ५ मुलांचा समावेश आहे.

स्वातंत्र्याच्या ७५ व्या वर्षानिमित्त मआझादी का अमृत महोत्सवाअंतर्गत २०२१ मध्ये सुरू झालेला हा उपक्रम विद्यार्थ्यांमध्ये देशभक्ती आणि शौर्य पुरस्कार विजेत्यांच्या पराक्रमाची जाणीव करून देण्यासाठी राबविला जातो. यंदाच्या वीर गाथा ५.० आवृत्तीमध्ये देशातील २३ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमधील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. विशेष म्हणजे, यंदा प्रथमच परदेशातील १८ देशांमधील ९१ सीबीएसई शाळांनी यात सहभाग नोंदवला, ज्यामधून परदेशातील ४ मुलांनीही विजेतेपदावर आपले नाव कोरले आहे. संपूर्ण देशातून एकूण १.९२ कोटी विद्यार्थ्यांनी या स्पर्धेसाठी नोंदणी केली होती.

महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांनी चित्रकला कविता परिच्छेद लेखन आणि मल्टिमीडिया सादरीकरण अशा विविध क्षेत्रांत आपल्या कौशल्याचे दर्शन घडवले. प्राथमिक गटात (इयत्ता ३ री ते ५ वी) सानवी भिंगारडे (कविता), वर्धन फलके (चित्रकला), जान्हवी खोत (परिच्छेद लेखन), वेदिका कविताके (परिच्छेद लेखन), विधी वानखेडे (चित्रकला) आणि मंजुश्री घोरपडे (परिच्छेद लेखन) यांनी यश मिळवले.

## मद्यपी चालकांवर तातडीने निलंबनाची कारवाई करा! : परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांचे निर्देश

**मुंबई (दै. संध्या) :**

कर्तव्यावर असताना मद्यपान करणाऱ्या एसटीच्या चालक व इतर कर्मचाऱ्यांना कोणतीही तडजोड न करता तातडीने निलंबित करण्याचे सक्त निर्देश परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिले आहेत.



आज मुंबईतील परळ बसस्थानकाला दिलेल्या अचानक भेटीदरम्यान मंत्री सरनाईक यांनी चालक-वाहकांच्या विश्रांतीगृहांची पाहणी केली. यावेळी विश्रांतीगृहांमध्ये अनेक ठिकाणी दारूच्या रिकाम्या बाटल्या आढळून आल्या, तसेच काही कर्मचाऱ्यांकडून मद्यपान केल्याची दुर्गंधी येत असल्याचे निदर्शनास आले. या गंभीर प्रकारामुळे संतप्त झालेल्या मंत्री सरनाईक यांनी तेथे उपस्थित वरिष्ठ अधिकाऱ्यांना चांगलेच धारेवर धरले.

यावेळी बोलताना मंत्री सरनाईक म्हणाले, परगावी कर्तव्य बजावणाऱ्या चालक-वाहकांसाठी विश्रांतीगृहांमध्ये उत्तम सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. मात्र, अशा ठिकाणी मद्यपानासारखे निंदनीय कृत्य घडत असेल, तर ते केवळ शिस्तभंग नाही तर प्रवाशांच्या जीवाशी थेट खेळ करणारे अत्यंत धोकादायक कृत्य आहे. मद्यपान करून कर्तव्यावर जाणारा कर्मचारी केवळ अपघाताला निमंत्रण देत नाही, तर एसटीच्या सुरक्षित व विश्वासार्ह प्रवासावरही प्रश्नचिन्ह निर्माण करतो. अशा बेजबाबदार कर्मचाऱ्यांना चौकशीअंती सेवेतून बडतर्फ केले पाहिजे, असा इशाराही त्यांनी दिला.

मात्र, अशा प्रकारांना वेळीच आळा न घालणारे अकार्यक्षम अधिकारीही तितकेच जबाबदार असल्याचे स्पष्ट करत मंत्री सरनाईक म्हणाले की, एसटीचे सुरक्षा व दक्षता खाते आणि संबंधित अधिकारी यांच्या दुर्लक्षामुळेच अशा बेशिस्त वर्तनाला खतपाणी मिळते. त्यामुळे संबंधित सुरक्षा व दक्षता अधिकाऱ्यांची विभागीय चौकशी करून त्यांच्यावर कठोर कारवाई करण्याचे निर्देश त्यांनी दिले.

यापुढे कर्तव्यावर जाणाऱ्या प्रत्येक कर्मचाऱ्याची, विशेषतः चालकांची ब्रेथ ॲनालायझरद्वारे चाचणी अनिवार्य करण्यात यावी. चाचणीत दोष आढळल्यास संबंधित कर्मचाऱ्याला तात्काळ निलंबित करण्याचे आदेशही मंत्री सरनाईक यांनी दिले. तसेच आज आढळून आलेल्या गैरप्रकारांबाबत स्वतंत्र विभागीय चौकशी समिती नेमून, अहवालाच्या आधारे दोषींवर कडक कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले.

या दौऱ्यात मंत्री सरनाईक यांनी बसस्थानकातील स्वच्छता, प्रसाधनगृहे आणि बसेसच्या नियोजनाचीही पाहणी केली. प्रवाशांच्या सुरक्षितता व सुखसुविधांबाबत अधिक दक्ष राहण्याच्या स्पष्ट सूचना त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

## विद्यार्थ्यांना आर.आर.आर. सेंटर संकल्पनेचे प्रात्यक्षिकाद्वारे मार्गदर्शन

### पिंपरी चिंचवड महापालिकेच्या आरोग्य विभागाचा उपक्रम

**पिंपरी (दै. संध्या) :**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने चिंचवड येथील जिजाऊ पर्यटन केंद्र येथे विद्यार्थ्यांना कचऱ्याचा कमी वापर, पुनर्वापर, पुनर्चक्रीकरण या तत्त्वांवर आधारित महापालिकेच्या अभिनव आर.आर.आर. सेंटर संकल्पनेची सविस्तर माहिती देण्यात आली. कचरा निर्मिती कमी करण्यासाठी दैनंदिन जीवनात कोणत्या सवयी अंगीकाराव्यात, वापरलेल्या वस्तूंचा पुनर्वापर कसा करता येईल.

तसेच पर्यावरण संरक्षणात प्रत्येक नागरिकाची भूमिका किती महत्त्वाची आहे, याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. महापालिकेच्या आरोग्य विभागाच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

पिंपरी चिंचवड शहर स्वच्छ, सुंदर आणि पर्यावरणपूरक बनविण्याच्या उद्देशाने महापालिका आयुक्त श्रावण हर्डीकर व अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांच्या मार्गदर्शनाखाली उपायुक्त डॉ. प्रदीप ठेंगल व सहाय्यक आयुक्त अमित पंडित यांच्या अधिपत्याखाली आरोग्य विभाग सातत्याने विविध उपक्रम राबवत आहे. या अंतर्गत ज्ञबफ क्षेत्रीय कार्यालयाअंतर्गत प्रभाग क्रमांक १७ मधील जिजाऊ पर्यटन केंद्र, चिंचवड येथे स्वच्छ सर्वेक्षण २०२६ तसेच माझी वसुंधरा ६.० अभियानाच्या अनुषंगाने स्वच्छता व पर्यावरण संवर्धनाबाबत विशेष जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.






यावेळी केंद्र शासनाच्या स्वच्छ आदत से स्वच्छ भारत या उपक्रमांतर्गत ओला व सुका कचरा विलगीकरणाचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यात आले. ओल्या कचऱ्यासाठी हिरव्या रंगाच्या डब्याचा व सुक्या कचऱ्यासाठी निळ्या रंगाच्या डब्याचा वापर कसा करावा, याचे प्रात्यक्षिकाद्वारे सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

तसेच कचरा रस्त्यावर अथवा सार्वजनिक ठिकाणी न टाकणे, सार्वजनिक ठिकाणी थुंकू नये, सिंगल यूज प्लास्टिकचा वापर टाळणे, सार्वजनिक शौचालयांचा योग्य वापर करणे तसेच फ्लश करा, हात स्वच्छ ठेवा या स्वच्छतेच्या सवयींबाबत विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती करण्यात आली. या उपक्रमात विद्यार्थी देखील बहुसंख्येने उत्स्फूर्तपणे सहभागी झाले.

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या आर.आर.आर. केंद्राच्या माध्यमातून कमी वापर, पुनर्वापर व पुनर्चक्रीकरण या संकल्पनांच्या आधारे शालेय स्तरावरच विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छतेबाबत सकारात्मक दृष्टिकोन निर्माण केला जात आहे. अशा अभिनव व कल्पक उपक्रमांमुळे शहर अधिक स्वच्छ, सुंदर व हरित होण्यास निश्चितच मदत होईल.
**- डॉ. प्रदीप ठेंगल, उपायुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका**

## जखमा, दोस्ती आणि एक परफेक्ट टेक : सरू मालिकेतील मोहक मटकरच्या खडतर कबड्डी शूटची गोष्ट !

**मुंबई (दै. संध्या) :**

अभिनेत्री मोहक मटकरहिने झी टीव्हीवरील सरू मालिकेच्या चित्रीकरणादरम्यान आलेल्या तिच्या सर्वात कठीण पण अविस्मरणीय अनुभवांपैकी एका अनुभवाबद्दल सांगितले. मालिकेतील हा ऊर्जेने भरलेला कबड्डी ट्रॅक तिला तिच्या नेहमीच्या मर्यादेपलीकडे ढकलणारा होता. भिवंडीमधील खुल्या मैदानात चित्रीत झालेले हे दृश्य तिच्यासाठी पूर्णपणे नवीन होते. ती स्वतः खेळाडू नसल्यामुळेव्यावसायिक कबड्डी खेळाडूंसोबत काम करताना तिला हा अनुभव अतिशय रोमांचक वाटला. या चित्रीकरणादरम्यान कबड्डीचा अस्सल जोश, नैसर्गिक गतिशीलता आणि खेळाचा अस्सल भाव टिपण्याची संधी तिच्यासाठी खास ठरली.






शूटची आठवण सांगताना मोहक म्हणाली, हा कबड्डी सीक्वेन्स माझ्या आतापर्यंत केलेल्या कामांपेक्षा पूर्णपणे वेगळा होता. यात कोणतीही कोरिओग्राफी नव्हती; सगळं अगदी नैसर्गिक आणि क्षणोक्षणी घडत होतं. एकाच टेकमध्ये हा सीन शूट करायचा होता, त्यामुळे रीटेकची संधीच नव्हती. कारण या दृश्यात आम्हाला खरोखर कबड्डी खेळायची होती.

ती पुढे म्हणाली, घागराचोली घातलेल्या मुलींसोबत कबड्डी खेळणे हा खूप वेगळा अनुभव होता. मी नृत्य करते, त्यामुळे हा प्रकार माझ्यासाठी एक अगदी वेगळे आव्हान होते.तिसऱ्या टेकपर्यंत, खासकरून शेवटच्या एंट्रीवेळी, माझ्या अंगावर चांगलेच ओरखडे आणि जखमा झाल्या होत्या. एका क्षणी तर सहा मुली अचानक माझ्यावर पडल्या, पण त्यामुळेच सीन अधिक नैसर्गिक दिसला. घाम, वेदना आणि अनपेक्षित असा हा क्षण असूनही हे आउटडोअर कबड्डी शूट तितकाच तीव्र, पण समाधान देणारा, अनियोजित पण प्रभावी होते. ज्ञसरूफच्या प्रवासातील हा विशेष ठरलेला अनुभवमाझ्यासाठीसंघर्ष आणि मजा यांचा सुंदर संगम ठरला.

या संपूर्ण संघर्षानंतरही मोहकला वाटतं की या अनुभवामुळे दृश्याला अधिक वास्तविकता मिळाली. सरूची जिद्द आणि तिच्या आत्मविश्वासाचे परिपूर्ण प्रतिबिंब असेलला हा कबड्डी ट्रॅक केवळ त्याच्या शारीरिकतेसाठी नाही, तर स्क्रीनवर दिसणाऱ्या प्रामाणिक आणि अनफिल्टर्ड भावना यांसाठीही उठून दिसतो.सध्या मालिकेत सरू भावनिक आणि परिस्थितीजन्य आव्हानांना सामोरी जात आहे. अनिका तिच्यावर मानसिक खेळी करत असताना, सरू वेद (शगुन पांडे)चे रक्षण करण्यासाठी झगडत आहे आणि प्रत्येक दिवशी तणाव अधिकच वाढत चालला आहे.

या दमदार कबड्डी सीनचा अनुभव घेण्यासाठी आणि सरूच्या प्रवासातील पुढची पायरी जाणून घेण्यासाठी पहा सरूदररोज संध्याकाळी ७:३० वाजता फक्त झी टीव्हीवर!

# मराठी भाषा ही सतत वाहणारी परंपरा : मराठी भाषा सचिव डॉ. किरण कुलकर्णी

**मुंबई (दै. संध्या) :**

मराठी भाषा ही केवळ संवादाचे माध्यम नसून हजारो वर्षांची सांस्कृतिक नदीसारखी सतत वाहणारी परंपरा आहे, असे प्रतिपादन मराठी भाषा आणि सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांनी केले.

महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागाच्या पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी यांच्या वतीने आयोजित ङ्गङ्घव्याख्यानमालाङ्घङ्घ या कार्यक्रमात त्यांनी मराठीच्या अभिजात दर्जाचे महत्त्व, भाषेचा ऐतिहासिक प्रवास आणि पुढील टप्प्यातील विकास आराखडा यावर सविस्तर मार्गदर्शन केले. यावेळी सांस्कृतिक कार्य विभागाच्या उपसचिव श्रीमती नंदा राऊत, पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीच्या संचालक श्रीमती मीनल जोगळेकर, सल्लागार समितीचे सदस्य डॉ.शिरीष ठाकूर तसेच मराठी भाषा अभ्यासक, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मराठीला अभिजात दर्जा मिळणे हे केवळ शिक्कामोर्तब नसून केंद्र शासनाच्या विशेष योजनेतून भाषाविकासासाठी संधी निर्माण करणारे असल्याचे सचिव डॉ.कुलकर्णी यांनी स्पष्ट केले. त्यांनी महाराष्ट्रीन प्राकृत, अपभ्रंश आणि पुढील अर्वाचीन मराठी असा भाषेचा प्रवास मांडत वररूचीच्या ङ्गप्राकृतप्रकाशफ ग्रंथाचा संदर्भ देऊन मराठीच्या प्राचीनत्वाचे पुरावे अधोरेखित केले. ज्ञानेश्वरी, लीळाचरित्र, संतसाहित्य आणि १९ व्या शतकातील आधुनिक मराठीच्या वाटचालीचा आढावा घेत त्यांनी मराठीतील प्रतिभा, माधुर्य आणि मौलिकता यावर प्रकाश टाकला. मात्र ज्ञानेश्वरपूर्व दीड हजार वर्षांच्या भाषिक-लिखित परंपरेवर अपेक्षित संशोधन कमी झाल्याची खंतही त्यांनी व्यक्त केली.

अभिजात भाषा योजनेअंतर्गत राज्याला ङ्गसेंटर ऑफ एक्सलन्सफ स्थापन करण्याची संधी मिळणार असून



त्याची अधिसूचना फेब्रुवारी-मार्चपर्यंत अपेक्षित असल्याचे डॉ.कुलकर्णी यांनी सांगितले. यासाठी विभागाकडून डीपीआर (ᶇझठ) तयार करण्याचे काम अंतिम टप्प्यात असून तज्ज्ञांच्या सल्ल्याने विविध प्रस्ताव त्यात समाविष्ट केले जात असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच अमरावती येथे झालेल्या ११ अभिजात भाषांच्या परिषदेचा उल्लेख करत ङ्गभाषिणीफ अ‍ॅपच्या माध्यमातून मराठीत केलेले भाषण तात्काळ इतर भाषांमध्ये दिसण्याचा प्रयोग राबवून महाराष्ट्राने तंत्रज्ञानाच्या माध्यमातून भाषासंवादाचा नवा मार्ग दाखवल्याचे त्यांनी सांगितले.

भाषांमधील ज्ञानभाषा आणि लोकभाषा या संकल्पना स्पष्ट करताना त्यांनी प्राकृत ही सामान्यजनांची भाषा, संस्कृत ही ज्ञानभाषा आणि आजच्या काळात इंग्रजी ही प्रबंधांच्या प्रमाणामुळे ज्ञानभाषा ठरते, तर मराठी ही लोकजीवनातील संवादाची भाषा असल्याचे त्यांनी सांगितले. प्रमाणभाषा ही विविध बोलीभाषांतील शब्द, व्याकरण आणि वापरातील पद्धती एकत्र येऊन तयार होते, त्यामुळे प्रमाणभाषा ही बोलीभाषांचे अपत्य असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. ङ्गअभिजातफ या संकल्पनेबाबत त्यांनी विविध पाश्चात्त्य विचारप्रवाह, विश्वकोषातील नोंदी आणि तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी सांगितलेले आदर्शानुकरण व संकेतपालन हे निकष समजावून सांगितले.

मराठीच्या संवर्धन, संशोधन, अनुवाद आणि रोजगारनिर्मितीच्या दृष्टीने विभागाने एका वर्षात मोठे लक्ष्य पूर्ण करण्याचा निर्धार असल्याचे सचिव डॉ.कुलकर्णी यांनी सांगितले. मनुष्यबळ, जागा आणि प्रशिक्षण या तीन मुद्द्यांवर भर देत विविध भाषांचे वाचक, कॉन्झर्व्हेटर्स तयार करण्यासाठी प्रशिक्षणक्रम राबवले जातील, असे त्यांनी नमूद केले. निधी उभारणीसाठी सीएसआरच्या माध्यमातून मराठी उद्योजकांकडून मदत घेण्याचा पर्यायही त्यांनी सूचित केला. मराठी प्रभुत्वाशी संबंधित अनेक उद्योग-संधी उपलब्ध असून काही उद्योजकांचा टर्नओव्हर ५०० कोटींच्या पुढे असल्याचेही त्यांनी सांगितले.

संशोधनाच्या क्षेत्रात मराठीच्या १,५०० वर्षांच्या दुर्लक्षित कालखंडावर अधिक अभ्यासाची गरज असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. पुढील टप्प्यात प्रकाशन व अनुवादासाठी ङ्गअनुवाद अकॅडमीफ ही स्वायत्त संस्था स्थापन केली जात असल्याचेही त्यांनी सांगितले. तंत्रज्ञानामुळे मशीन ट्रान्सलेशन सक्षम होत असून मराठीतील स्पेल चेक, शब्दपर्याय, प्रेडिक्टिव्ह टायपिंग यांसारख्या सुविधा विकसित करण्यासाठी लोकांनी मोबाईलवर अधिकाधिक मराठी टाइप करावे, असे आवाहनही त्यांनी केले. व्याख्यानाच्या शेवटी त्यांनी अभिजात दर्जानंतरच्या नियोजनासाठी उपस्थितांच्या सूचना मागवत मराठीच्या भविष्यकालीन विकासासाठी सामूहिक सहभाग महत्त्वाचा असल्याचे स्पष्ट केले.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### आंध्रप्रदेशचे उपमुख्यमंत्री कोनिडल पवन कल्याण यांचे नांदेड विमानतळ येथे आगमन

नांदेड : आंध्रप्रदेशचे उपमुख्यमंत्री कोनिडल पवन कल्याण यांचे आज २५ जानेवारी रोजी नांदेड येथील गुरु गोविंद सिंघ जी विमानतळावर आगमन झाले. उपमुख्यमंत्री श्री.कल्याण यांचे स्वागत खासदार अशोक चव्हाण, आमदार श्रीजया चव्हाण व जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले. उपमुख्यमंत्री श्री.कल्याण हे विमानतळ येथून शासकीय वाहनाने गुरुद्वारा व मोदी मैदान येथे आयोजित हिंद दी चादर ङ्घ श्री.गुरु तेग बहादुर साहीब जी यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त आयोजित कार्यक्रमाला उपस्थित राहण्यासाठी विमानतळ येथून रवाना झाले.



### दिल्लीचे उद्योग, अन्न व नागरी पुरवठा मंत्री सरदार मनजींदर सिघ सिरसा यांचे नांदेड विमानतळ येथे आगमन व स्वागत

नांदेड : दिल्ली सरकारचे उद्योग,अन्न व नागरी पुरवठा,पर्यावरण व वने मंत्री सरदार मनजींदर सिंघ सिरसा यांचे आज विमानाने श्री गुरु गोबिंद सिंघजी विमानतळ येथे आगमन झाले. विमानतळावर श्री.सिरसा यांचे आगमन प्रसंगी खासदार अशोक चव्हाण,आमदार श्रीजया चव्हाण व जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. श्री.सिरसा हे विमानतळ येथून गुरुद्वारा व मोदी मैदान येथे आयोजित ङ्घ हिंद दी चादर ङ्घ श्री.गुरु तेग बहादुर साहीब जी यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त आयोजित कार्यक्रमाला उपस्थित राहण्यासाठी रवाना झाले.



### दिलखुलास आणि जय महाराष्ट्र मध्ये उपजिल्हाधिकारी जयराम पवार यांची विशेष मुलाखत

मुंबई : माहिती व जनसंपर्क महासंचालनालय निर्मित दिलखुलास आणि जय महाराष्ट्र या कार्यक्रमांत हिंद-दी-चादर श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त हिंद-दी-चादर श्री गुरू तेग बहादुर साहिबजी यांच्या ३५० व्या शहिदी समागम समितीचे सदस्य तथा उपजिल्हाधिकारी जयराम पवार यांची विशेष मुलाखत प्रसारित होणार आहे. या मुलाखतीत उपजिल्हाधिकारी पवार यांनी श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांनी राष्ट्रासाठी आणि संस्कृती रक्षणासाठी दिलेले बलिदान आणि मानवतावादी मूल्यांचे आजच्या समाजातील महत्त्व अधोरेखित केले आहे. या शहीदी वर्षाचे ऐतिहासिक व सामाजिक महत्त्व स्पष्ट करताना, सामाजिक सलोखा, एकात्मता आणि परंपरेचे जतन करण्यासाठी अशा उपक्रमांची गरज त्यांनी व्यक्त केली.

## सेवा स्टॉल्सना उत्स्फूर्त प्रतिसाद; भाविकांनी व्यक्त केले समाधान

**नांदेड (दै. संध्या) :**

श्री. गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त आयोजित भव्य कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर भाविकांच्या सेवेसाठी सेवा स्टॉल्स उभारण्याचे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी नांदेडकरांना केले होते. या आवाहनाला नांदेडवासीयांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

विविध शासकीय कार्यालये, सेवाभावी संस्था, व्यावसायिक आस्थापना, व्यापारी संघटना, बँका, पतसंस्था, शिक्षण संस्था, उत्पादक, उद्योजक तसेच लोकप्रतिनिधींनी पुढाकार घेत सेवा स्टॉल्ससाठी नोंदणी केली. समागम परिसराच्या चहूबाजूंनी निःशुल्क सेवा स्टॉल्स उभारण्यात आले होते. या स्टॉल्सवर चहा, बिस्किटे, नाश्ता, फलाहार, पाणी, सरबत, आईस्क्रीम, लस्सी, चिक्की, उसाचा रस आदी विविध पदार्थांची दिवसभर रेलचेल पाहायला



मिळाली. बीएसएनएलच्या वतीने मोफत सिमकार्डचे वितरण करण्यात आले. तसेच आरोग्य तपासणी व औषध वाटप उपक्रमाचाही हजारो भाविकांनी लाभ घेतला. याशिवाय मेंदूची व्यायामशाळा, पर्यटन विकास, विमान उड्डाण क्षेत्रातील रोजगार संधी, कृषी व पोस्ट विभागाच्या विविध योजनांबाबत मार्गदर्शन करण्यात आले. आबालवृद्धांसह दूरवरून आलेल्या भाविकांनी या सेवा उपक्रमांचा लाभ घेतला. सेवा स्टॉल्सच्या माध्यमातून देण्यात आलेल्या निःशुल्क सेवांबाबत बहुसंख्य भाविकांनी समाधान व्यक्त केले. सर्व स्टॉलधारकांनी दोन्ही दिवस योग्य नियोजन करून उत्कृष्ट सेवा बजावली असून ही सेवा निश्चितच प्रशंसनीय असल्याचे मत व्यक्त करण्यात येत आहे. या सेवा उपक्रमांमुळे नांदेडकरांचा सेवाभाव भाविकांच्या मनात कायम राहील. जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या मार्गदर्शनाखाली स्टॉल व्यवस्थापन पथकाने स्टॉल नियोजन, वितरण व संचालनासाठी विशेष परिश्रम घेतले.

## शिवकार्य प्रतिष्ठान तर्फे श्री. शंभूराज्यभिषेक सोहळा उत्साहात साजरा..!

**मुंबई (दै. संध्या) :**

विक्रोळी कन्नमवार नगरातील श्री शिवकार्य प्रतिष्ठान तर्फे श्री.शंभूराज्यभिषेक सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला. छत्रपती संभाजी महाराज यांचा माघ शुद्ध सप्तमी आंध्र दि.२५ जानेवारी २०२६ हा ३४५ वा राज्यभिषेकदिन सोहळा होता.पहाटे विक्रोळी कन्नमवार नगरातील स्वयंभू हनुमान मंदिर पासून छत्रपती संभाजी महाराजांची सजवलेली पालखीची पायी मिरवणूक काढण्यात आली.प्रतिष्ठानच्या मावळ्यांनी भगव्या टोप्या परीधान केल्या होत्या.हर हर महादेव, छत्रपती शिवाजी महाराज की जय, छत्रपती संभाजी महाराज की जय, भारतमाता की जय, हिंदु धर्म की जय या घोषणांनी परिसर दणाणून गेला. पालखीची मिरवणूक धर्मवीर संभाजी महाराज मैदानात आली.मैदानात संभाजी महाराजांच्या पुतळ्यास शाल व पुष्पहार घालण्यात आला.त्यानंतर संभाजी महाराजांच्या प्रतिकृतीस दुधाचा अभिषेक करण्यात आला.

श्रीसंभाजीसुर्यह्दय श्लोकाचे सामुदायिक पठन करण्यात आले.५ वीत शिकणारी शिवकन्या अमृता हळदे हीने माय भवानी तुझे लेकरी मानून घे आई व मुठभर घेऊन लढला शिवबा संभाजी राजा ही गाणी गाऊन उपस्थित मावळ्यांचे लक्ष्य वेधले.श्री शिवकार्य प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रभाकर भोसले अनेक वर्ष हा कार्यक्रम राबवित आहेत.या अनोख्या कार्यक्रमामुळे



धर्मवीर संभाजी महाराज मैदानात पहाटे मॉर्निंग वॉकला येणाऱ्या नागरिकांचे लक्ष्य वेधून घेतले होते.श्री शिवकार्य प्रतिष्ठान कन्नमवार नगरात वेगवेगळे उपक्रम राबवित असतात. हे येथे आर्वजून सांगावसे वाटते.

## प्रजासत्ताक दिनी देशातील एकूण ९८२ जणांचा विविध पुरस्काराने सन्मान

### महाराष्ट्रातील ८९ अधिकारी–कर्मचाऱ्यांना शौर्य व सेवा पदके जाहीर

**नवी दिल्ली (दै. संध्या) :**

भारताच्या ७७ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त देशातील पोलीस, अग्निशमन, होमगार्ड आणि सुधारात्मक सेवेतील एकूण ९८२ अधिकारी व कर्मचाऱ्यांना शौर्य आणि सेवा पदके जाहीर करण्यात आली आहेत. महाराष्ट्रातील एकूण ८९ अधिकारी व कर्मचारी यांना विविध क्षेत्रातील कामगिरीसाठी पुरस्कार जाहीर झाले आहेत. यामध्ये ३१ पोलीस कर्मचाऱ्यांना मवीरता पदक, उत्कृष्ट आणि विशिष्ट सेवेसाठी दिले जाणारे राष्ट्रपती पदक पोलीस दलातील ४ अधिकारी आणि सुधारात्मक सेवा विभागातील २ कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. उल्लेखनीय सेवेसाठी महाराष्ट्रातील पोलीस सेवेतील ४०, अग्निशमन सेवेसाठी ४, नागरी संरक्षण व होमगार्ड सेवेतील ३, सुधारात्मक सेवेतील ५ या अधिकारी-कर्मचाऱ्यांना पुरस्कार जाहीर करण्यात आले.

प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला केंद्रीय गृहमंत्रालया मार्फत दरवर्षी पोलीस, अग्निशमन, होमगार्ड आणि सुधारात्मक सेवेतील कार्यासाठी शौर्य आणि सेवा पदके दिली जातात.

महाराष्ट्राला मिळालेल्या विविध श्रेणीतील पदक प्राप्त अधिकारी व कर्मचाऱ्यांची यादी

**वीरता पदक- पोलीस सेवा**

१. अमोल नानासाहेब फडतरे, सहाय्यक पोलीस निरीक्षक, २. वासुदेव राजम मडावी, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक, ३. मधुकर पोचाय्या नैताम, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक ४. संतोष वसंतराव नैताम, नाईक पोलीस कॉन्स्टेबल ५ कै. सुधाकर बिताजी वेलादी नाईक पोलीस कॉन्स्टेबल (मरणोपरांत) ६. विलास मारोती पोर्तेट नाईक पोलीस कॉन्स्टेबल ७. विश्वनाथ सन्यासी सदमेक, नाईक पोलीस कॉन्स्टेबल ८. ज्ञानेश्वर सदाशिव फाडणे, नाईक पोलीस कॉन्स्टेबल ९. दिलीप वासुदेव सद्मेक, नाईक पोलीस कॉन्स्टेबल १०. रामसू देवू नरोटे, नाईक पोलीस कॉन्स्टेबल ११. आनंदराव बाजीराव उसेंडी,नाईक पोलीस कॉन्स्टेबल १२. राजू पंडित चव्हाण, नाईक पोलीस कॉन्स्टेबल १३. अरुण कैलास मेश्राम, पोलीस कॉन्स्टेबल १४. नितेश गंगाराम वेलाडी, पोलीस कॉन्स्टेबल १५. मोहन लच्छू उसेंडी, पोलीस कॉन्स्टेबल १६. संदिप गणपत वसाके, पोलीस कॉन्स्टेबल १७. कैलास देवू कोवासे ,पोलीस कॉन्स्टेबल १८. हरिदास महारू कुलयेती, पोलीस कॉन्स्टेबल १९. किशोर चंती तलांडे, पोलीस कॉन्स्टेबल २०. अनिल रघुपती आलम, पोलीस कॉन्स्टेबल २१. नरेंद्र दशरथ मडावी, पोलीस कॉन्स्टेबल २२. आकाश अशोक उईके, पोलीस कॉन्स्टेबल २३. स्वर्गीय करे इरपा आत्राम, पोलीस कॉन्स्टेबल (मरणोपरांत) २४. राजू मासा पुसाळी, पोलीस कॉन्स्टेबल २५. महेश दत्तूजी जकेवार, पोलीस कॉन्स्टेबल २६. रुपेश रमेश कोडापे, पोलीस कॉन्स्टेबल २७. मुकेश शंकर सडमेक, पोलीस कॉन्स्टेबल २८. योगेंद्रराव उपेंद्रराव सदमेक, पोलीस कॉन्स्टेबल २९. घिस्सू वांजा आत्राम, पोलिस कॉन्स्टेबल ३०. अतुल भगवान मडावी पोलीस कॉन्स्टेबल ३१. विश्वनाथ लक्ष्मण मडावी पोलीस कॉन्स्टेबल

**विशिष्ट सेवेसाठी राष्ट्रपती पदक** : १. श्री महेश उदाजी पाटील, अतिरिक्त आयुक्त, महाराष्ट्र २. श्री बाळकृष्ण मोतीराम यादव, पोलीस उपायुक्त, महाराष्ट्र ३. श्री सायरस बोमन इराणी, सहाय्यक पोलीस आयुक्त, महाराष्ट्र ४. श्री विठ्ठल खंडुजी कुबडे, सहाय्यक पोलीस आयुक्त, महाराष्ट्र

**सुधारात्मक सेवा** : १. श्री विजय बाबाजी परब, सुभेदार २. श्री राजू विठ्ठलराव हेटे, हवालदार

**उत्कृष्ट सेवेसाठी पदक (एमएसएम)** : १. श्री राजीव वीरेंद्र कुमार जैन, पोलीस महानिरीक्षक २. श्री सुधीर कल्या हिरेमठ, पोलीस महानिरीक्षक ३. श्रीमती शीला दिनकर साहिल, पोलीस अधीक्षक ४. श्री मोहन मुरलीधर दहीकर, पोलीस अधीक्षक ५. श्री पुरुषोतम नारायण कराड, पोलीस अधीक्षक ६. श्रीमती. किरण जितेंद्रसिंह पाटील, अतिरिक्त पोलीस अधीक्षक ७. श्रीमती. नीलम प्रशांत वाव्हळ, पोलीस उपअधीक्षक ८. श्री अविनाश शंकरराव शिळीमकर, निरीक्षक (पीए) ९. श्री गजानन रामराव शेळके, पोलीस उपअधीक्षक १०. श्री महेश रमेश तावडे, सहाय्यक पोलीस आयुक्त ११. श्री विजय मारोतीराव माहुलकर, अतिरिक्त पोलीस अधीक्षक १२. श्री समीर नारायण साळुंके, सहाय्यक पोलीस आयुक्त १३. श्री पराग बापूराव पोटे, पोलीस उपअधीक्षक १४. श्री दयानंद सदाशिव गावडे, पोलीस उपअधीक्षक १५. श्रीमती. पुष्पलता राजाराम दिघे, पोलीस उपअधीक्षक, १६. श्री सुनील शंकर शिंदे, निरीक्षक १७. श्रीमती. सुवर्णा उमेश शिंदे, निरीक्षक (पीए) १८. श्री अनंत ज्ञानेश्वर माळी, पोलीस उपअधीक्षक १९. श्री महेंद्र दत्तात्रय कोरे, निरीक्षक/आरओ/आरएम २०. श्री कैलाश रामजी बाराभाई, निरीक्षक/आरओ/आरएम २१. श्री विजय गोपाळ मोहिते, उपनिरीक्षक २२. श्री भारत रावसाहेब सावंत, इन्स्पेक्टर/एआरएमआर २३. श्री नरेंद्र सखाराम राऊत, सहाय्यक उपनिरीक्षक २४. श्री सतीश जनार्दन निंबाळकर, उपनिरीक्षक २५. श्री अफजल खान शहेजादे खान पठाण, सहाय्यक उपनिरीक्षक २६. श्री प्रदिप साहेबराव सावंत, सहाय्यक उपनिरीक्षक २७. श्री सुभाष वामन साळवी, उपनिरीक्षक २८. श्री प्रमोद रोहिदास वाघमारे, निरीक्षक (पीए) २९. श्री विजयकुमार शंकर शिंदे, उपनिरीक्षक ३०. श्री विक्रम व्यंकटराव नवरखेडे, उपनिरीक्षक ३१. श्री विजय प्रभाकर देवरे, उपनिरीक्षक ३२. श्री मनोज यशवंत गुजर, उपनिरीक्षक ३३. श्री अजय मनोहर सावंत, उपनिरीक्षक ३४. श्री गंगाधर रामचंद्र घुमरे, उपनिरीक्षक ३५. श्री संजय एकनाथ शेलार, उपनिरीक्षक ३६. श्री महादेव मधुकर खंडारे, निरीक्षक/एआरएमआर ३७. श्री राजकुमार चनवीरप्पा टोळनुरे, उपनिरीक्षक ३८. श्री बाबासाहेब नाथा ढाकणे, उपनिरीक्षक ३९. श्री शिवदास दत्तात्रय फुटाणे, उपनिरीक्षक ४०. श्री सुरेश साहेबराव सोनवणे, उपनिरीक्षक

**अग्निशमन सेवा** : १. श्री हरिश्चंद्र वसंत गिरकर, उप. मुख्य अग्निशमन अधिकारी, २. श्री दामोदर वनगड, अग्निशमन अधिकारी ३. श्री कांचन बंडू पाटील, ड्रायव्हर ऑपरेटर ४. श्री काशिनाथ राजनाथ मिश्रा, अग्रगण्य फायरमन

**नागरी संरक्षण व होमगार्ड** :

१. श्री गंगाधर वखाजी वुरकुड, प्लाटून कमांडर २. श्री राजेंद्र मधुकरराव बन्सोड, प्लाटून कमांडर ३. श्री नागेश्वरराव अल्कोंदिया पोडदाली, प्लाटून कमांडर

**सुधारात्मक सेवा** :

१. श्री अशोक शिवराम करकर, अधीक्षक २. श्री गोविंद केशव राठोड, अतिरिक्त अधीक्षक ३. श्री राजेंद्र भाऊसाहेब धनगर, हवालदार ४. श्री सुनील भाऊसो लांडे, हवालदार ५. श्री प्रल्हाद महिपती शिंदे, हवालदार

## महाराष्ट्रात राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियमांतर्गत योजनांची अंमलबजावणी प्रभावीपणे : अध्यक्ष डॉ. एस. पी. कत्याल

**मुंबई (दै. संध्या) :**

मुंबई : राज्यात राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम–२०१३ अंतर्गत राबविण्यात येत असलेल्या सार्वजनिक वितरण व्यवस्था, शालेय पोषण आहार योजना व राष्ट्रीय एकात्मिक बाल विकास सेवा योजना या तिन्ही महत्त्वाच्या योजनांची अंमलबजावणी प्रभावी व समाधानकारक असल्याचे मत हिमाचल प्रदेशच्या राज्य अन्न आयोगाचे अध्यक्ष एस. पी. कत्याल यांनी व्यक्त केले.

ठाणे जिल्हाधिकारी कार्यालय येथे आयोजित आढावा बैठकीस अध्यक्ष कत्याल उपस्थित होते. बैठकीत राज्य अन्न आयोग मुंबईचे सह सचिव तथा सदस्य सचिव आत्राम, सचिव प. फ. गांगवे यांच्यासह ठाणे जिल्ह्यातील पुरवठा, शिक्षण तसेच महिला व बाल विकास विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

यावेळी अध्यक्ष कत्याल यांनी राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियमांतर्गत लाभार्थ्यांना देण्यात येणाऱ्या अन्नधान्य, पोषण आहार व बालकल्याण सेवांची सविस्तर माहिती जाणून घेतली. तसेच योजनांची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी विविध विभागांकडून करण्यात येत असलेल्या उपाययोजनांचा आढावा घेत विभागनिहाय सूचना केल्या.

बैठकीनंतर अध्यक्ष कत्याल यांनी सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत ठाणे येथील एका रास्त भाव दुकानास भेट देऊन प्रत्यक्ष वितरण प्रक्रियेची पाहणी केली. तसेच एका अंगणवाडीला भेट देऊन बालकांसाठी राबविण्यात येणाऱ्या सेवांचा आढावा घेतला. याशिवाय इस्कॉन संस्थेमार्फत अक्षयपात्र योजनेअंतर्गत चालविण्यात येणाऱ्या केंद्रीय स्वयंपाकघरास भेट देऊन शाळांमध्ये वितरित करण्यात येणाऱ्या मध्यान्ह भोजनाच्या निर्मिती प्रक्रियेची माहिती घेतली.

बैठक व क्षेत्रीय पाहणीअंती अध्यक्ष एस. पी. कत्याल यांनी राज्यातील राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम–२०१३ अंतर्गत सर्व योजना चांगल्या पद्धतीने राबविल्या जात असल्याबाबत समाधान व्यक्त करत संबंधित यंत्रणांचे कौतुक केले.



# अप्पासाहेब पवार पशु-पक्षी प्रदर्शनांतर्गत विविध स्पर्धांचे पारितोषिक वितरण संपन्न

**बारामती (दै. संध्या)**

बारामती-ग्रीकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्टच्या कृषी विज्ञान केंद्र बारामतीच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या कृषी प्रदर्शनाच्या शेवटच्या दिवशी शेतकऱ्यांचा मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद लाभला. आज मा. खासदार (राज्यसभा) सौ. सुनेत्रा पवार, मा. सौ. सुनंदाताई पवार यांनी प्रदर्शनास सविस्तर भेट दिली. आज शेवटच्या दिवशी सहभागी कंपन्यांना ट्रस्टचे चेअरमन मा. श्री. राजेंद्र दादा पवार व मा. श्री. विश्वजित वाबळे, उद्योजक यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र व संस्थेचे प्रतिक रोप देऊन सन्मानित करण्यात आले. यामध्ये जैन एरिगेशन, पुणे जिल्हा मध्यवर्ती सह. बँक, प्रतिभा बायोटेक, आरडोअर सीड्स, नेचर डीलाईट, राइज एन शाईन, अग्रोस्टार, आत्मा, जिल्हा परिषद, महाराष्ट्र शासन कृषी विभाग इ. कंपन्यांचा व संस्थाचा सन्मान करण्यात आला.

अप्पासाहेब पवार पशु पक्षी प्रदर्शनाअंतर्गत विविध स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. त्याचे बक्षीस वितरण ट्रस्टचे चेअरमन मा. श्री. राजेंद्रदादा पवार व विश्वस्त मा. श्री. राजीव देशपांडे यांच्या हस्ते करण्यात आले. कालवड स्पर्धातील विजेते व पारितोषिके- प्रथम क्रमांक: श्री. प्रदीप पाटील, निमगाव ता. माढा जि. सोलापूर, रु. ३१,०००/- + ट्रॉफी द्वितीय क्रमांक : योगेश टाव्हरे, आंबेगाव, पुणे, रु. २१,०००/- + ट्रॉफी तृतीय क्रमांक : गणेश टाव्हरे, आंबेगाव, पुणे, रु. ११,०००/- + ट्रॉफी तसेच देशी गाई स्पर्धेमध्ये देविदास नरवटे, अहमदपूर जि. लातूर यांनी प्रथम क्रमांक पटकावला. देशी वळू स्पर्धेमध्ये संतोष कोकणे ,नंदादेवी ता. दौंड तर संकरित वळू स्पर्धेमध्येचंद्रकांत आटोळे, खातगाव ता. कर्जत यांनी प्रथम क्रमांक पटकावला.विजेत्यांना ट्रॉफी व प्रशस्तीपत्रक राजेंद्र दादा पवार व राजीव देशपांडे यांच्या हस्ते करण्यात आले.

# राज्यस्तरीय जलद बुद्धिबळ स्पर्धा सोमवारी

## विनायक नवयुग मित्र मंडळ आणि हिंद शक्ती सोशल फाउंडेशनच्या वतीने आयोजन

**पुणे (दै. संध्या)**

विनायक नवयुग मित्र मंडळ ट्रस्ट आणि हिंद शक्ती सोशल फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने श्रेयसी नरहर गोडबोले यांच्या स्मृतीप्रित्यर्थ १७ वी एकदिवसीय राज्यस्तरीय जलद बुद्धिबळ स्पर्धा प्रजासत्ताक दिनानिमित्ताने सोमवार दिनांक २६ जानेवारी रोजी होणार आहे,

महाराष्ट्र बुद्धिबळ संघटना आणि पुणे जिल्हा बुद्धिबळ सर्कल यांच्या मान्यतेने होणारी ही स्पर्धा भांडारकर रोडवरील साने डेअरी चौक येथील मिलेनियम टॉवर्स या ठिकाणी होणार आहे, अशी माहिती मंडळाचे कार्याध्यक्ष नगरसेवक सुनील पांडे लोहगावकर आणि मंडळाचे अध्यक्ष दत्तात्रय फंड यांनी दिली.



ही स्पर्धा खुल्या तसेच १४ आणि १० वर्षांखालील अशा तीन गटात होणार आहे. स्विस लीग पद्धतीने होणारी ही स्पर्धा एकूण सात फेऱ्यांमध्ये होईल. यात १८० पेक्षा अधिक खेळाडूंनी आपला सहभाग नोंदविला आहे.

क्रीडा समिती अध्यक्ष म्हणून समीर हाळंदे काम पाहणार आहेत. स्पर्धेसाठी वरुण जकातदार,अभिजित मोडक, दिनेश आंबुरे, योगेश जोगळेकर, चैतन्य रड्डी, भूषण मोरे यांचा संयोजन समितीत सहभाग आहे. या स्पर्धेला चीफ आर्बिटर म्हणून अथर्व गोडबोले काम पाहणार आहेत. स्पर्धेतील विजेत्यांना एकूण ५० हजार रुपयांची रोख पारितोषिके; तसेच करंडक, पदके व प्रशस्तीपत्र दिली जाणार आहेत यंदाच्या या स्पर्धेला सर्वाधिक प्रतिसाद लाभला आहे.

मानांकन यादी- खुला गट - अविरत चौहान (२०५६) , ओम लमकाने (१९७७), पृथू देशपांडे (१९५८), लथिक राम (१९०५) आणि मेनन पद्मानंद (१७१८)

१० वर्षाखालील गट - वरद मुळ्ये (१७५२), करमवीर सिंग (१४१३)

१४ वर्षाखालील गट - अभिजय वाल्वेकर (१७२४), कविश लिमये (१६७०), विहान देशमुख (१६२६), सम्यक कुलकर्णी (१६०५) आणि आयुष महुरकर (१५४८)

# पुष्पा इम्पॉसिबल मध्ये तितलीच्या खऱ्या आई-वडिलांचा शोध घेण्यासाठी पुष्पाची तीव्र यात्रा

**पुणे (दै. संध्या)**

सोनी सबचा पुष्पा इम्पॉसिबल प्रेक्षकांच्या मनाला भिडत आहे, कारण पुष्पा (करुणा पांडे) आपल्या प्रवासातील सर्वात कठीण टप्प्याला सामोरी जात आहे. एक समर्पित गृहिणीपासून ते ठाम वकील होईपर्यंत, पुष्पाने नेहमीच जीवनातील आव्हानांसमोर खंबीरपणे उभे राहिले आहे. आता, जेव्हा ती तितलीच्या खऱ्या आई-वडिलांची सत्यता उलगडण्याचा प्रयत्न करते, तेव्हा पुष्पा स्वतःला वाढत्या धोक्यांमध्ये आणि आपल्या मूल्यांमध्ये अडकलेली पाहते, आणि भीती किंवा अनिश्चिततेला आपल्या निर्धाराला डळमळीत होऊ देत नाही.

आगामी भागांमध्ये, पुष्पा (करुणा पांडे) तितलीच्या (भूमी रामोला) खऱ्या आई-वडिलांचा शोध अधिक तीव्र करते,



तिच्या ओळखीमागील सत्य जाणून घेण्यासाठी ठाम निर्धार करते. पुष्पा आणि दिलीप (जयेश मोरे) रुग्णालयातील नोंदी शोधतात आणि तितलीच्या आई-वडिलांची ओळख पटवण्याच्या अत्यंत जवळ पोहोचतात, पण त्यांची सून प्रार्थना (पूजा कातुर्दे) यांच्याकडून कळते की ते आता जिवंत नाहीत. प्रत्येक धागा दुःखद शेवटाकडे नेतो, आणि पुष्पाला जाणवते की तितलीचा भूतकाळ उलगडणे तिच्या कल्पनेपेक्षा अधिक धोकादायक ठरू शकते.

सत्य आणि धोक्याच्या दरम्यान अडकलेली पुष्पा, तितलीबद्दलचे सत्य वेळेपूर्वी शोधू शकेल का?

चालू कथानकाबद्दल बोलताना करुणा पांडे, जी पुष्पाची भूमिका साकारत आहे, सांगतात कधी कधी तुमच्याकडे सगळे उत्तर नसते, पण तरीही तुम्हाला ठाऊक असते की थांबता येणार नाही. पुष्पा अशा टप्प्यावर आहे जिथे तितलीच्या आई-वडिलांचा शोध घेण्याच्या प्रत्येक पावलाने अधिक प्रश्न निर्माण होतात, तरीही ती पुढे जाण्याचा निर्णय घेते. ही एक शांत प्रकारची ताकद आहे आपल्या अंतर्ज्ञानाचे अनुसरण करणे, भीतीला सामोरे जाणे आणि सत्य जड वाटत असतानाही शोध सुरू ठेवणे.

पाहा पुष्पा इम्पॉसिबल, दर सोमवार ते शनिवार रात्री ९:३० वाजता, फक्त सोनी सबवर.

# सोनी सबवरील नवी मालिका 'गणेश कार्तिकेय'

सोनी सबवरील 'गणेश कार्तिकेय' मालिकेत काम करणारी श्रेनु पारिख म्हणते, मराठी कुटुंबात लग्न केल्यानंतर मी अष्टविनायक मंदिरांबद्दल खूप काही ऐकले आहे आणि आता त्या कहाण्या आता मी पडद्यावर जगत आहे

सोनी सबवरील 'गाथा शिव परिवार की गणेश कार्तिकेय' ही पौराणिक मालिका प्रेक्षकांना गणेशाच्या अष्टविनायक रूपांचे दर्शन करण्यासाठी आमंत्रित करत आहे. मालिकेतील सध्याच्या कथाभागात अष्टविनायक रूपांच्या मागील कथा आणि बोध प्रेक्षक अनुभवत आहेत. या प्रत्येक दिव्य रूपाच्या मागील आध्यात्मिक लक्षणीयता प्रेक्षकांनी जाणावी, हा मालिकेचा प्रयत्न आहे.

श्रेनू पारिख, जी शोमध्ये देवी पार्वतीची भूमिका साकारत आहे, हिच्यासाठी हा ट्रॅक घरात एक परिचित सूर घेऊन आला आहे. महाराष्ट्रीयन कुटुंबात विवाह झाल्यानंतर तिने अष्टविनायक मंदिरांविषयी अनेकदा ऐकले होते, आणि आता हा ट्रॅक पडद्यावर उलगडताना पाहणे हे तिच्यासाठी आणि तिच्या पती अक्षयसाठी एक सामायिक अनुभव ठरले आहे. या अनुभवाला आणखी खास बनवते ते म्हणजे या शोमुळे कुटुंबात सुरू झालेल्या संवाद. एपिसोड्स प्रसारित होत असताना, श्रेनूच्या सासरच्या मंडळी अष्टविनायक यात्रेशी संबंधित कथा, विधी आणि आठवणी शेअर करतात, ज्यामुळे पाहण्याचा अनुभव अधिक रोचक आणि परंपरेशी जोडलेला होतो.



आपले विचार शेअर करताना श्रेनू म्हणते, महाराष्ट्रीयन कुटुंबात विवाह झाल्यानंतर मी अष्टविनायक मंदिरांविषयी खूप काही ऐकले आहे आणि आता मी त्या कथा पडद्यावर पुन्हा जगत आहे. हा ट्रॅक पाहताना अक्षय आणि मी मिळून मंदिरांविषयी, त्यांच्या दंतकथांविषयी आणि भक्तांसाठी त्यांच्या महत्त्वाविषयी अनेक नवीन गोष्टी शिकत आहोत. सर्वात खास म्हणजे माझे सासरचे आता आमच्यासोबत बसतात आणि अष्टविनायक यात्रेशी संबंधित त्यांचे स्वतःचे अनुभव, विधी आणि आठवणी शेअर करतात. हे घरात एक सामायिक कौटुंबिक क्षण बनले आहे. त्यामुळे या कथा पडद्यावर साकारताना माझ्यासाठी त्या अधिक वैयक्तिक आणि आत्मीय वाटतात. बघत रहा, 'गणेश कार्तिकेय' दर सोमवार ते शनिवार रात्री ८ वाजता फक्त सोनी सबवर.

# जय पराजय होत असतात, आशा सोडू नका, लढत रहा

## अजिंक्य डी वाय पाटील विद्यापीठाच्या पदवीप्रदान समारंभात पंकजा मुंडे यांचे विद्यार्थ्यांना आवाहन

**पुणे (दै. संध्या)**

आयुष्यात जय पराजय होत असतात. काही गोष्टी मिळतात तर काही मिळत नाहीत. पण आशा सोडू नका. लढत रहा असे आवाहन पशुसंवर्धन आणि पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी विद्यार्थ्यांना केले.

अजिंक्य डी वाय पाटील विद्यापीठाच्या दहाव्या पदवी प्रदान समारंभात त्या बोलत होत्या. अजिंक्य डी वाय पाटील विद्यापीठाचे कुलपती डॉ अजिंक्य डी वाय पाटील अध्यक्षस्थानी होते. यावेळी कोऑपरेटिव्ह रिपब्लिक ऑफ गयानाचे भारतातील उच्चायुक्त धरमकुमार सीराज, विद्यापीठाचे कुलगुरु डॉ राकेश कुमार जैन, संरक्षण मंत्रालय अभ्यास गटाचे अध्यक्ष डॉ. निशिकांत ओझा, रजिस्ट्रार डॉ. सुधाकर शिंदे यांच्यासह विद्यापीठाच्या विविध विभागांचे डीन उपस्थित होते.

अजिंक्य डी वाय पाटील विद्यापीठातर्फे भारतीय क्रिकेट संघाचे माजी कर्णधार रोहित शर्मा, पंकजा गोपीनाथ मुंडे, उद्योजक व धोरणात्मक सल्लागार मनोज पोचट, गोल्डियम इंटरनॅशनल लिमिटेडचे कार्यकारी अध्यक्ष, राशेश भन्साळी, सनातन धर्म फाउंडेशन सुदेश अग्रवाल, उज्जैन येथील गुरुजी प्रमोद शर्मा यांना डी लीट पदवी प्रदान करण्यात आली.



विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना पंकजा मुंडे म्हणाल्या, तुम्ही आयुष्याच्या नव्या टप्प्याला सुरुवात करत आहात. डोळ्यात असंख्य स्वप्ने आहेत. ही स्वप्ने पूर्ण करण्यासाठी कष्ट करा. पण केवळ लौकिक यशाच्या मागे धावू नका तर आनंदी व्यक्ती बना. सकारात्मक रहा. तीच तुमची ऊर्जा असेल.

डॉ अजिंक्य डी वाय पाटील म्हणाले, शिक्षित भारत घडविण्याचे स्वप्न माझ्या वडिलांनी पाहिले आहे. त्यासाठी सातत्याने काम करत आहे. भारत जागतिक महासत्ता म्हणून उदयाला येत आहे. यावेळी विद्यार्थ्यांची जबाबदारी आणखी वाढली आहे.

पाटील म्हणाले, अजिंक्य डी वाय पाटील विद्यापीठ इनोव्हेशनचे केंद्र म्हणून पुढे यादृष्टीने आमची वाटचाल सुरू आहे.

विद्यापीठातून नवनवीन कल्पनांचा उगम व्हावा ही आमची अपेक्षा आहे. आमचे विद्यार्थी ही अपेक्षा यशस्वीपणे पूर्ण करत आहेत.

कुलगुरू डॉ राकेश कुमार जैन म्हणाले, अजिंक्य डी वाय पाटील विद्यापीठाच्या नावातच इनोव्हेशन आहे. विद्यार्थ्यांनी विचार करून नवनिर्मिती करावी असा आमचा प्रयत्न आहे.

अभियांत्रिकी, विधी यासारख्या पारंपरिक विद्या शाखांबरोबरच नवीन ज्ञान शाखाचे शिक्षण सुरू केले आहे. विद्यार्थ्यांच्या नवनिर्मितीला चालना मिळत आहे. प्रसिद्ध अभिनेत्री विद्या माळवदे यांनी सूत्रसंचालन केले.

# क्षयरोग निर्मूलनाकरीता भिवंडी महापालिकेच्या विविध उपाययोजना

**भिवंडी (दै. संध्या)**

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका राष्ट्रीय क्षयरोग दूरीकरण कार्यक्रमाच्या अनुषंगाने प्रधानमंत्री टी.बी. मुक्त भारत अभियान अंतर्गत क्षयरोग निर्मूलनाकरीता विविध उपाययोजना राबविण्याचे शासनाचे निर्देश आहेत. या करीता अभियानांतर्गत नागरीक, लोकप्रतिनिधी, अशासकीय संस्था, सहकारी संस्था, कॉरपोरेट संस्था इ. सर्वाचा सहभाग घेवून क्षयरोग निर्मुलन करणे शासनास अभिप्रेत आहे.

या योजनेअंतर्गत क्षयरोग रुग्णांना पुरविणे अपेक्षित आहे. याकामी साधारणतः सहा महिने ते दोन वर्षे (क्षयरोगचे औषध सुरु असे पर्यंत) मासिक रु ६००/- ते रु. ८००/- (इच्छेनुसार) प्रमाणे खर्च अपेक्षित आहे. शासनाने ठरवून दिलेल्या निकषांनुसार सदर ऱ्रेच इरीज्ञशीं आपण स्वतः तयार करुन रुग्णांना पुरवू शकता किंवा एखाद्या व्यक्ती/संस्थेमार्फत सुध्दा पुरवू शकता. सद्या आपल्या शहरामध्ये अंदाजे ४११४ रुग्ण आहेत. सहा महीन्यांचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर शासनाच्या निक्षय पोर्टलद्वारे प्रमाणपत्र दिले जाईल. याकरीता शासनाच्या निक्षय प्रणालीवर संबंधीतांचे नांव नोंदविले जाते. याकरीता संबंधीताचे नांव, पत्ता, ई-मेल आयडी, मो.नं. व किती रुग्ण दत्तक घेणार असल्याची माहिती अनिल गुप्ता, जिल्हा समन्वयक, मो.नं. ७०२१५०७४२७ यांना संपर्क करावा.

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रामधील क्षयरोग निर्मूलन करणेकरीता रुग्णांना औषधोपचार, इतर मदत तसेच जनजागृती करणे आवश्यक आहे. यांचा सहभाग वाढविणेकामी भिवंडी निजामपूर शहर महानगर पालिकेच्या प्रशासक तथा आयुक्त अनमोल सागर (भा.प्र.से.) यांनी आणि वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. संदीप गाडेकर तथा शहर क्षयरोग अधिकारी डॉ. बुशरा सय्यद यांनी शहरातील सर्व नागरीक, लोकप्रतिनिधी, अशासकीय संस्था, सहकारी संस्था, कॉरपोरेट संस्था, शासकीय व निमशासकीय अधिकारी/कर्मचारी इ. यांना निक्षय मित्र बनण्याकरिता जाहीर आवाहन करीत आहेत. या सर्वांनी सामाजिक बांधीलकी लक्षात घेवून, शहरामधील क्षयरुग्णांचे मदतीसाठी स्वतः पुढे येऊन आवश्यक ती मदत करावी.

# दूध आणि बीफ उद्योगातील दुवा उघड पुण्यात तरुणांचे प्रभावी आंदोलन

**पुणे (दै. संध्या)**

प्रजासत्ताक दिनाच्या सप्ताहानिमित्त सुरू असलेल्या देशव्यापी मोहिमेचा भाग म्हणून, पुण्यातील तरुणांनी भारतातील दूध उत्पादन आणि बीफ निर्यात उद्योगातील परस्परसंबंधांवर लक्ष वेधले. पुणे निमल लिबरेशन या तरुण-नेतृत्वाखालील प्राणीहक्क संघटनेच्या वतीने जे.एम. रोडवरील संभाजी उद्यानात माहितीवर आधारित आणि प्रभावी दृश्य प्रदर्शन सादर करण्यात आले.

भारत हा जगातील सर्वात मोठा दूध उत्पादक देश असला तरी, त्याचवेळी तो बीफचा प्रमुख निर्यातदार देश असल्याकडे या प्रदर्शनातून लक्ष वेधण्यात आले. सरकारी व जागतिक आकडेवारीनुसार, भारतात दरवर्षी २३० दशलक्ष टनांहून अधिक दूध उत्पादन होते, तर सुमारे १.३ दशलक्ष टनांहून अधिक बीफची निर्यात केली जाते. दूध पुरवणारी यंत्रणाच प्रत्यक्षात बीफ पुरवठा साखळीला हातभार लावत असल्याचा दावा यावेळी करण्यात आला. दूध देण्याची क्षमता कमी झाल्यावर किंवा आर्थिकदृष्ट्या फायदेशीर न राहिल्यावर जनावरांची विक्री केली जाते आणि त्यांना मांस उद्योगाकडे वळवले जाते. डेअरी उद्योग आणि बीफ व्यापार हे वेगळे नसून एकमेकांशी घट्ट जोडलेले आहेत, असे या उपक्रमातून मांडण्यात आले. शहरांमध्ये रस्त्यावर दिसणाऱ्या जखमी, कुपोषित आणि दूध देणे थांबवलेल्या गायी हे याचे सर्वात ठळक उदाहरण असल्याचे कार्यकर्त्यांनी सांगितले. पुण्यातील अनेक भागांमध्ये अशा गायी प्लास्टिकसह कचरा खाताना दिसतात, ही बाब चिंताजनक असल्याचे त्यांनी नमूद केले.

यासंदर्भात प्राणीहक्क कार्यकर्ते प्रवीण म्हणाले, दूध देणे बंद झाल्यानंतर रस्त्यावर दिसणाऱ्या अनेक गायी जवळच्या डेअरीमधूनच आलेल्या असतात, याची जाणीव बहुतेकांना नसते. दूध आणि मांस उद्योगातील हा दुवा समजून घेण्यासाठी नागरिकांनी माँ का दूध हा माहितीपट पाहावा.प्राणीहक्क कार्यकर्त्या श्वेता बोरगावकर म्हणाल्या, दूध आणि मांस उद्योग वेगळे असल्याचा समज आहे. मात्र आकडेवारीनुसार हे एकाच साखळीचे भाग आहेत. जनावरे दुधासाठी उपयोगी न राहिल्यावर त्यांना मांस उद्योगात ढकलले जाते. या वास्तवाबाबत जनजागृती करणे गरजेचे आहे.

# राष्ट्रीय चालक दिनानिमित्त चालकांना 'सुगंधाचा वारसा' देऊन सन्मानित

**पुणे (दै. संध्या)**

भारतातील सर्वात मोठ्या अगरबत्ती उत्पादकांपैकी एक असलेल्या सायकल प्युअर अगरबत्तीच्या वतीने राष्ट्रीय चालक दिनानिमित्त देशभरातील चालकांना 'व्हाईब पॉवरबॅग एअर फ्रेशनर'चे वाटप करून त्यांचा सन्मान करण्यात आला. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ (एमएसआरटीसी), ओला कंझ्यूमर, व्हीआरएल, कर्नाटक राज्य मार्ग परिवहन महामंडळ (केएसआरटीसी), इंडियन फेडरेशन ऑफ प-बेस्ड ट्रान्सपोर्ट वर्कर्स (आयएफएटी) आणि डीटीसी (दिल्ली ट्रान्सपोर्ट कॉर्पोरेशन) यांच्या सहकार्याने हा उपक्रम राबवण्यात आला. देशाची सेवा करणाऱ्या, प्रतिकूल परिस्थितीत आणि दीर्घकाळ काम करून प्रवाशांना त्यांच्या गंतव्यस्थानी पोहोचण्यास मदत करणाऱ्या चालकांप्रती कृतज्ञता व्यक्त करणारा असा हा एक हृदयस्पर्शी उपक्रम होता.

चालकदिनानिमित्त सायकल प्युअरअगरबत्तीच्या वतीने मुंबई, बंगळूर, चेन्नई, हैदराबाद, दिल्ली, कोलकाता, पुणे, अहमदाबाद, लखनऊ आणि जयपूर या दहा शहरांमध्ये सुमारे १० लाख 'व्हाईब पॉवर बॅग एअर फ्रेशनर' सॅशेचे वाटप




करण्यात आले. या सहकार्याचा एक भाग म्हणून,सायकल प्युअर अगरबत्तीच्या वतीने केएसआरटीसी सोबत भागीदारी करून बंगळूर, म्हैसूर आणि मंगळूर विभागांतील त्यांच्या एसी प्रीमियम बसेसमध्ये 'व्हाईब पॉवर बॅग एअर फ्रेशनर' चे वाटप करण्यात आले. त्यातून चालक आणि प्रवासी दोघांनाही ताज्यातवान्या आणि सुखदायक प्रवासाचा अनुभव घेण्याची सुनिश्चिती त्यातून करण्यात आली. 'व्हाईब पॉवर बॅग एअर फ्रेशनर'मध्ये पायनॅपल पंच, पिंक ब्लॉसम आणि पल सिनेमन या सुगंधांचा वापर करण्यात आला आहे. हे सुगंध वाहनाला ताजेपणा देतात, तसेच चालक आणि प्रवाशांच्या मनाला शांती आणि आराम देतात. देशातील लोकांना, शहरांना आणि समुदायांना नेहमीच एकमेकांशी जोडणाऱ्या, सतत कर्तव्यावर असलेल्या भारतीय चालकांबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी या सुगंधाची विशेषतः निवड करण्यात आली आहे.

भारताचे चालक लाखो प्रवाशांसाठी सुरक्षितता आणि आरामाची सुनिश्चिती करतानाच वाहतूक कोंडी, खराब हवामान आणि वेळेच्या दबावातून मार्ग काढतात. कार्यालयीन कर्मचारी, विद्यार्थी, कुटुंबांची वाहतूक करण्यापासून, आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यापासून ते अत्यावश्यक वस्तूंची वाहतूक करण्यापर्यंत, ते अत्यंत चिकाटी आणि संयमाने प्रचंड जबाबदारी पार पाडतात. या उपक्रमाद्वारे त्यांच्या कष्टाचा गौरव करण्यात आला, केवळ त्यांनी केलेल्या प्रवासासाठीच नव्हे तर या प्रत्येक प्रवासात त्यांनी जपलेल्या विश्वासासाठीही.

या उपक्रमाबद्दल बोलताना सायकल प्युअर अगरबत्तीचे व्यवस्थापकीय संचालक अर्जुन रंगा म्हणाले, ड्रायव्हर म्हणजे भारताला दररोज गतिमान ठेवणारी अदृश्य शक्ती आहे. सायकल प्युअर अगरबत्तीच्या दृष्टीने सुगंधाचा अर्थ नेहमीच शांतता आणि भावनिक स्वास्थ्य निर्माण करणे हा राहिला आहे. कृतज्ञतेची एक छोटी पण अर्थपूर्ण भावना व्यक्त करण्याची आमची इच्छा होती, त्यामुळे चालकांना रस्त्यावरील त्यांच्या लांबच्या प्रवासात आराम, ताजेपणा आणि निवांतपणाचा अनुभव घेता येईल.

देश अखंडपणे आणि विनाअडथळा कार्यरत राहील याची खात्री करणाऱ्या निस्वार्थ चालकांना राष्ट्रीय चालक दिनानिमित्त सायकल प्युअर अगरबत्तीच्या या उपक्रमात भारतीय वाहतुकीचा कणा म्हणून ओळख देण्यात आली.

## थोडक्यात पण महत्त्वाचे

### आळंदी नगरपरिषदेत महीलाराज ; विषय समित्या व स्थायी समिती बिनविरोध

**आळंदी :** महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ तसेच संबंधित नियमांनुसार आळंदी नगरपरिषदेच्या विषय समित्या व स्थायी समितीचे गठन विशेष सभेत बिनविरोध करण्यात आले. विषय समित्यांच्या गठनानंतर स्थायी समितीची रचना जाहीर करण्यात आली. यामध्ये प्रशांत पोपट कुऱ्हाडे यांची स्थायी अध्यक्षतेखाली समितीचे सभापती तसेच आळंदी नगरपरिषदेचे अध्यक्ष म्हणून बिनविरोध निवड करण्यात आली.

पाणीपुरवठा व जलनिस्सारण समितीच्या सभापती म्हणून सुजाता कालिदास तापकीर यांची निवड झाली आहे. सार्वजनिक बांधकाम व स्वच्छता समितीच्या सभापतीपदी साक्षी अक्षय कुऱ्हाडे, शालेय शिक्षण, क्रीडा व सांस्कृतिक समितीच्या सभापतीपदी खुशी सागर बोरुंदिया, मागासवर्गीय कल्याणकारी व सार्वजनिक आरोग्य समितीच्या सभापतीपदी वैजयंता अशोक उमरगेकर, यात्रा, नियोजन व विकास समितीच्या सभापतीपदी पूजा संजय घुंडरे, महिला व बालकल्याण व वैद्यक समितीच्या सभापतीपदी ऋतुजा अनिकेत तापकीर, तर महिला व बालकल्याण व वैद्यक समितीच्या उपसभापतीपदी कांचन किरण येळवंडे यांची निवड करण्यात आली.

दरम्यान शिवसेनेचे नगरसेवक आदित्य घुंडरे यांची नगरपरिषदेच्या विरोधी पक्षनेतेपदी निवड करण्यात आली आहे. सदर विषय समित्या व स्थायी समितीचा कार्यकाळ एक वर्षासाठी राहणार असल्याची माहिती सभेत देण्यात आली. विषय समित्या व स्थायी समितीचे सभापती व सदस्य बिनविरोध निवडून आल्याबद्दल पिठासीन अधिकारी तथा मुख्याधिकारी माधव खांडेकर यांनी सर्व नवनिर्वाचित पदाधिकारी व सदस्यांचे अभिनंदन केले.

### धामणीला खंडोबा देवस्थान परिसरात लोकवर्गणीतून जलकुंभ बांधला

**मंचर :** धामणी (तालुका आंबेगांव) येथील श्री कुलस्वामी म्हाळसाकांत खंडोबा देवस्थान परिसरात भाविकांच्या पिण्याचे पाण्याच्या सुविधेसाठी लोकवर्गणीतून रुपये अकरा लाख खर्च करुन चाळीस हजार लिटर क्षमतेचा जलकुंभ( पाण्याची टाकी)बांधण्यात आलेली असल्याचे ग्रामस्थ व सेवेकरी मंडळीनी सांगितले धामणी येथील हे खंडोबा देवस्थान पुणे.नगर.नाशिक व मुंबई जिल्ह्यातील लाखो भाविकांचे श्रध्दास्थान व कुलदैवत असून माघ पोर्णिमेच्या यात्रेला तळीभंडार व दर्शनासाठी देवकार्यासाठी हजारो भाविक सहकुटुंब येतात.यात्रेच्या तीन दिवस कालावधीत भाविकांचा देवस्थान परिसरात मुक्काम असतो.गेल्या काही वर्षात धामणीच्या यात्रेला अन्य ठिकाणाहून हजारो भाविक श्रध्देने येतात.दिवसेदिवस वाढत जाणाऱ्या भाविकांच्या संख्येमुळे त्यांना पाण्याचा पुरवठा करणाऱ्या दोन पाण्याच्या टाक्या अपुऱ्या पडू लागल्यामुळे बाहेर गावाहून येणाऱ्या भाविक मंडळीनी लोकवर्गणीतून नवीन मोठी पाण्याची टाकी बांधण्याची मागणी गेल्या वर्षीच्या(फेब्रुवारी २०२५) यात्रेत देवस्थानाकडे केलेली होती. देवस्थानाने रुपये अकरा लाख लोकवर्गणीतून जमा करुन जलकुंभाचे काम पूर्ण केलेले असून येणाऱ्या माघ पौर्णिमेच्या यात्रेच्या कालावधीत (१ फेब्रुवारी २६ ते ३ फेब्रुवारी२६)भाविकांना शुध्द पिण्याचे पाण्याची सुविधा उपलब्ध होणार असल्याचे ग्रामस्थ व सेवेकऱ्यांनी सांगितले.आगामी कालावधीत भाविकांच्या सोईसाठी लोकवर्गणीतून अन्य विकास कामे करणार असल्याचे ग्रामस्थांनी यावेळी सांगितले.

### युवा चित्रकार वरद यांचे भानूबेन प्रवीण शहा विद्यालयात प्रात्यक्षिक

उरण : युसुफ मेहर अली सेंटर संचलित भानूबेन प्रवीण शहा माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, तारा येथे विद्यार्थ्यांसाठी 'प्रवास चित्रकलेचा' या विशेष उपक्रमांतर्गत मार्गदर्शन व प्रात्यक्षिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात उरणचे सुपुत्र,युवा चित्रकार वरद खुशाली विलास गावंड यांनी इयत्ता आठवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांसमोर शाळेतील शिक्षिका रवीना म्हात्रे यांचे 'व्यक्तिचित्र' रेखाटण्याचे प्रात्यक्षिक सादर करून उपस्थितांची मने जिंकली. चित्रकलेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांची वैयक्तिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि रचनात्मक वैचारिक वृद्धी व्हावी, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता.

चित्रकला ही केवळ कागदावरील रंगकाम नसून ती विचारांना दिशा देणारे एक प्रभावी माध्यम आहे. सृजनशीलतेमुळे विद्यार्थ्यांच्या बौद्धिक क्षमतेत वाढ होते. कार्यक्रमाला शाळेचे मुख्याध्यापक अरुण एस कदम, कलाशिक्षक सहदेव बाविस्कर, शिक्षिका रवीना आनंद म्हात्रे यांच्या विशेष सहकार्यासह विद्यालयातील व महाविद्यालयातील आर एम म्हात्रे, एस.जी जोशी, एस आर म्हात्रे, आर डी पाटील, एस एल पाटील, एन के मोकल आदी शिक्षक कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शाळेच्या वतीने चित्रकार वरद यांचे आभार मानण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये चित्रकला विषयाबद्दल नवचैतन्य निर्माण झाल्याचे पाहायला मिळाल



### आरती बागुल यांना सावित्रीबाई फुले शिक्षिका - २०२५' पुरस्काराने सन्मानित

पुणे : महाराष्ट्र प्रदेश शिक्षक काँग्रेस समिती, पश्चिम महाराष्ट्र (पुणे विभाग) शिक्षक काँग्रेस समिती व सातारा शिक्षक काँग्रेस समिती यांच्या वतीने दिला जाणारा सावित्रीबाई फुले शिक्षिका – २०२५' हा प्रतिष्ठेचा पुरस्कार पुणे येथील शिक्षिका मा. सौ. आरती मयूर बागुल यांना सन्मानित करण्यात आला आहे.

मा. श्री. गोपाळ दादा तिवारी: प्रवक्ते, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस समिती, यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

शिक्षण क्षेत्रातील त्यांचे उल्लेखनीय कार्य, वंचित कुटुंबातील मुलांना अध्यापनातील योगदान, सामाजिक क्षेत्रातील सहभाग, मातृत्व व सामाजिक बांधिलकी जपत केलेले शैक्षणिक कार्य तसेच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी केलेल्या प्रयत्नांची दखल घेत हा पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. सदर पुरस्कारासाठी आवश्यक ती कागदपत्रे व माहिती समितीकडे सादर करण्याचे आवाहन करण्यात आले होते, पुरस्कार वितरण सोहळा दिनांक २५ जानेवारी २०२६ रोजी सातारा येथे होणार आहे.

या निवडीबद्दल शिक्षक संघटना व शिक्षण क्षेत्रातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून, पुढील शैक्षणिक व सामाजिक वाटचालीसाठी त्यांना हार्दिक शुभेच्छा देण्यात येत आहेत.

# दाव्होस दौऱ्यावर टीका नव्हे, तर पारदर्शकतेची मागणी

## मागील चेण वर श्वेतपत्रिका जाहीर करा - माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांची मागणी

**मुंबई ( दै. संध्या )**



महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांच्या दाव्होस दौऱ्यावर केवळ टीका करणे योग्य नाही. जर खरोखर ३० लाख कोटी रुपयांचे सामंजस्य करार (चेण) झाले असतील, तर ही राज्यासाठी आनंदाची बाब आहे. राज्याच्या औद्योगिक प्रगतीसाठी परकीय गुंतवणूक येणे आवश्यकच आहे. मात्र, मोठे आकडे सांगून जनतेची दिशाभूल करणे योग्य नाही, कारण सत्य शेवटी बाहेर येतेच, असे मत माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी व्यक्त केले आहे.

माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी यासंदर्भात सोशल मीडियावर ट्वीट करत मागील दाव्होस दौऱ्यांमध्ये जाहीर करण्यात आलेल्या चेण बाबत थेट प्रश्न उपस्थित केले आहेत. मागील दौऱ्यांतील चेण पैकी महाराष्ट्रात प्रत्यक्षात किती उद्योग सुरू झाले? किती गुंतवणूक प्रत्यक्षात आली? आणि त्यातून किती रोजगार निर्माण झाले? हे प्रश्न आजही अनुत्तरित असल्याचे त्यांनी नमूद केले आहे.

मोठ्या आकड्यांच्या घोषणा नव्हे, तर प्रत्यक्षात आलेली गुंतवणूक आणि त्यातून निर्माण होणारा रोजगार महत्त्वाचा आहे, असे स्पष्ट मत त्यांनी आपल्या ट्वीटमधून मांडले आहे.

दरम्यान, दाव्होससारख्या आंतरराष्ट्रीय मंचावर आपल्याच राज्यातील किंवा भारतीय कंपन्यांशी चेण करण्याबाबत कर्नाटक सरकारचे उद्योगमंत्री एम. बी. पाटील यांनी यापूर्वी केलेले निरीक्षणही पृथ्वीराज चव्हाण यांनी अधोरेखित केले आहे. कर्नाटक सरकार दाव्होस मध्ये केवळ परकीय गुंतवणूकदारांशीच करार करते, त्यामुळेच कर्नाटकात मोठ्या प्रमाणावर परकीय उद्योग येतात आणि त्या राज्याचे दरडोई उत्पन्न महाराष्ट्रापेक्षा अधिक असल्याचे त्यांनी सांगितले होते.

या पार्श्वभूमीवर अदानी, लोढा यांसारख्या स्थानिक कंपन्यांबरोबर दाव्होस मध्ये चेण करणे हे आंतरराष्ट्रीय गुंतवणूक परिषदेच्या उद्देशालाच हरताळ फासणारे असून, हा प्रकार क्रूर विनोद' असल्याची टीका पृथ्वीराज चव्हाण यांनी केली आहे.

महाराष्ट्रातील बेरोजगार युवकांना इव्हेंट्स किंवा मोठ्या घोषणांपेक्षा पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि प्रत्यक्ष रोजगार हवा आहे. त्यामुळे आतापर्यंतच्या दाव्होस दौऱ्यांमध्ये जाहीर करण्यात आलेल्या चेण पैकी प्रत्यक्षात किती मोठे परकीय उद्योग महाराष्ट्रात सुरू झाले, किती गुंतवणूक आली आणि किती रोजगार निर्माण झाले, याबाबत मुख्यमंत्र्यांनी श्वेतपत्रिका जाहीर करावी, अशी ठाम मागणी माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी केली आहे.

### फेसबुक वरील मैत्री महिलेला पडली महागात

**चाकण :** फेसबुक वरील मैत्री महाळुंगे इंगळे एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील एका महिलेला चांगलीच महागात पडली. तिच्या मित्राने बहिणीच्या लग्नाचे कारण देऊन त्यांच्याकडून रोख रक्कम, दागिने आणि मोबाईल असा ९२ हजार रुपये किंमतीचा ऐवज लंपास केला.

चाकण एमआयडीसीतील आंबेठाण येथे हा प्रकार घडला. याप्रकरणी एका २५ वर्षीय तरुणीने महाळुंगे इंगळे एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यानुसार बबन कुशवाह याच्याविरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फेसबुक वर ओळख करून फिर्यादी सोबत प्रेमसंबंध निर्माण केले. त्यानंतर स्वतःच्या बहिणीच्या लग्नासाठी पैशांची गरज असल्याचे सांगितले. तसेच फिर्यादी कडून ९२ हजार रुपये किमतीचे दागिने, रोख रक्कम आणि मोबाईल अशा मौल्यवान वस्तू घेतल्या. या वस्तू परत न करता बबल याने तिचा विश्वासघात करून अपहार केला.

महाळुंगे इंगळे एमआयडीसी पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन सूर्यवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली अधिक तपास सुरू आहे.

### जेजुरी नगरपरिषदेच्या पाणीपुरवठा सभापतीपदी मंदाताई बयासः सावंत प्रतिष्ठानकडून गौरव

**जेजुरी ( दै. संध्या )**



जेजुरी नगरपरिषदेच्या पाणीपुरवठा सभापतीपदी मंदाताई रमेश बयास यांची नियुक्ती झाल्याबद्दल ज्येष्ठ पत्रकार संजयआप्पा सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली सावंत प्रतिष्ठानच्या वतीने त्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी संजयआप्पा सावंत यांनी मंदाताई बयास यांच्या सामाजिक कार्याची व जबाबदारीची प्रशंसा करत पाणीपुरवठा विभागाच्या माध्यमातून शहराच्या विकासासाठी भरीव कार्य होईल, असा विश्वास व्यक्त केला.

सत्कारप्रसंगी जेजुरीतील उद्योजक महेश म्हेत्रे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रम अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. कार्यक्रमाचे नियोजन कै. दिनकरराव सावंत प्रतिष्ठानच्या राज्यस्तरीय समाजभूषण पुरस्कार समितीचे अध्यक्ष तसेच महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक महामंडळाचे राज्यसचिव, राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त प्राचार्य नंदकुमार सागर, कै.दिनकरराव सावंत प्रतिष्ठानच्या राज्यस्तरीय समाजभूषण पुरस्कार समितीचे कार्याध्यक्ष व मार्तंड देवस्थानचे माजी प्रमुख विश्वस्त प्रा. पत्रकार नितीन राऊत, सावंत प्रतिष्ठानचे सचिव व राज्यस्तरीय समाजभूषण पुरस्कार समितीचे सदस्य पत्रकार प्रल्हाद गिरमे तसेच दिनकरराव सावंत प्रतिष्ठानचे सदस्य व राज्यस्तरीय समाजभूषण पुरस्कार समितीचे सदस्य सामाजिक कार्यकर्ते संतोष सावंत आदींनी केले.

### सुहित जीवन ट्रस्टच्या तीन विद्यार्थ्यांचे राष्ट्रीय स्पर्धांमध्ये यशस्वी पदार्पण

**रायगड ( दै. संध्या )**

स्पेशल ऑलिंपिक भारत, महाराष्ट्र आयोजित नागपूर, रामटेक येथे राज्यस्तरीय आंतरशालेय ॲथलेटिक्स स्पर्धा उत्साहात पार पडल्या. या स्पर्धेत राज्यातील ३६ जिल्ह्यांतील विविध संस्थांमधून वेगवेगळ्या वयोगटांतील एकूण ३२० विशेष खेळाडूंनी सहभाग घेतला. सुहित जीवन ट्रस्ट, पेण, रायगडमधील मनीष गणेश म्हात्रे याने या स्पर्धेतील १८ वर्षांवरील वयोगटात उल्लेखनीय कामगिरी करत २०० मीटर धावणे स्पर्धेत सुवर्ण पदक मिळविले.

अर्जुन पांडुरंग वारे याने १४ ते १८ वयोगटांत २०० मीटर धावणे स्पर्धेत रौप्य पदक, तसेच सिद्धिका मंदार पाटील हिने ६ ते १२ वयोगटांत ५० मीटर धावणे स्पर्धेत सुवर्णपदक मिळविले. त्यांच्या या यशामुळे त्यांची शुक्रवार, दि. ३० जानेवारी २०२६ रोजी महर्षी दयानंद विद्यापीठ, रोहतक, हरियाणा येथे होणार असलेल्या राष्ट्रीय स्तरावरील ॲथलेटिक्स



स्पर्धांसाठी निवड झाली आहे.

संस्थेतील या विद्यार्थ्यांच्या उत्कृष्ट यशाबद्दल, तसेच त्यांनी केवळ संस्थेचेच नव्हे तर संपूर्ण रायगड जिल्ह्याचे नाव उंचावल्यामुळे समाजाच्या विविध स्तरांतून आणि संपूर्ण महाराष्ट्रातून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे. त्यांच्या या देदीप्यमान यशामागे त्यांचे पालक, संस्था, शिक्षक यांचे मोलाचे मार्गदर्शन आणि सहकार्य लाभले आहे.

### जिल्हा परिषदांच्या निवडणुकीचा निवडणूक आयुक्तांकडून आढावा

**छत्रपती संभाजीनगर, ( दै. संध्या )**

छत्रपती संभाजीनगर, परभणी, लातूर आणि धाराशिव या चार जिल्ह्यांत जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुका ५ फेब्रुवारीस होणार असून, ७ फेब्रुवारीस मतमोजणी होणार आहे. निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर जिल्हानिहाय तयारीचा आढावा राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी घेतला.

विभागीय आयुक्त कार्यालयात झालेल्या बैठकीस विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर, आयोगाचे उपसचिव सूर्या कृष्णमूर्ती, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, परभणीचे जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण, लातूरच्या जिल्हाधिकारी वर्षा ठाकुर-घुगे, धाराशिवचे जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार, छत्रपती संभाजीनगर परिक्षेत्राचे पोलीस महानिरीक्षक वीरेंद्र मिश्र, छत्रपती संभाजीनगरचे पोलीस आयुक्त प्रवीण पवार, पोलीस अधीक्षक डॉ. विनय राठोड, परभणीचे पोलीस अधीक्षक विरेंद्रसिंह परदेशी, धाराशिवच्या



पोलीस अधीक्षक रितू खोकर प्रत्यक्ष उपस्थित होते, तर नांदेड परिक्षेत्राचे विशेष पोलिस महानिरिक्षक शहाजी उमाप, लातूर पोलीस अधीक्षक अमोल तांबे व सागर पाटील सहाय्यक पोलीस महानिरीक्षक (कायदा व सुव्यवस्था) दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते. छ. संभाजीनगर विभागात निवडणुकीबाबत करण्यात आलेल्या तयारीची माहिती महसूल व पोलीस अधिकाऱ्यांनी सादरीकरणातून दिली. विभागात करण्यात आलेल्या निवडणुकांच्या तयारीबाबत वाघमारे यांनी समाधान व्यक्त केले. या निवडणुका निर्भय वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टीने प्रयत्न करण्यात येत असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले.

# राज्यातील शेतीत शेतकरी महिलांचे योगदान मोलाचे

## सह्याद्री अतिथीगृहातील चर्चासत्रात रस्तोगी यांचे प्रतिपादन

**मुंबई, २५ जानेवारी (आ.प्र.) :**

राज्यातील शेतीत महिलांचे मोलाचे योगदान आहे. महिला शेतकऱ्यांसाठी शासन विविध योजना व उपक्रम राबवत असून, शाश्वत शेतीसाठी कृषी विभागा मार्फत विविध उपाययोजना राबवण्यात येत आहेत. एम. एस. स्वामिनाथन रिसर्च फाउंडेशन कृषी विभागासोबत शेतकरी महिलांच्या विकासासाठी काम करत आहे, असे कृषी विभागाचे अपर मुख्य सचिव विकासचंद्र रस्तोगी यांनी सांगितले.



सह्याद्री अतिथीगृहातील चर्चासत्रात सहभागी विकासचंद्र रस्तोगी, डॉ. सौम्या स्वामिनाथन व मान्यवर.

कृषी विभाग आणि स्वामिनाथन रिसर्च फाउंडेशनने सह्याद्री अतिथीगृहात महिला शेतकऱ्यांच्या विविध विषयांच्या अनुषंगाने आयोजिलेल्या चर्चासत्रात रस्तोगी बोलत होते. फाउंडेशनच्या अध्यक्षा डॉ. सौम्या स्वामिनाथन, शेतकरी महिला प्रतिनिधी, महिलांविषयक काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्था, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय विभागाचे सचिव एन. रामास्वामी, सहकार व पणन विभागाचे प्रधान सचिव प्रवीण दराडे, कृषी आयुक्त सूरज मांढरे, नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाचे प्रकल्प संचालक परिमल सिंग, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषदेच्या महासंचालक वर्षा लड्डा, एकात्मिक बाल विकास सेवा आयुक्त कैलास पगारे, उमेद अभियानाचे मुख्य कार्यकारी अधिकारी निलेश सागर, मुख्यमंत्री कार्यालयाच्या विशेष कार्यकारी अधिकारी प्रिया खान, विधी व न्याय विभागाचे संयुक्त सचिव मकरंद कुलकर्णी, तसेच महिला किसान अधिकार मंचच्या सीमा कुलकर्णी यांनीही यावेळी विचार मांडले. बीडच्या द्वारकाताई वाघमारे, तुळजापूरच्या वैशाली घुगे, मावळ तालुक्यातील शांताबाई वारवे या महिला शेतकऱ्यांनी आपले अनुभव मांडले. दैनंदिन शेतीतील अडचणी, शासनाने करावयाच्या उपाययोजनांबाबतही त्यांनी मते मांडली.

# स्वदेशी शस्त्रास्त्र प्रदर्शनातून पुणेकरांनी अनुभवले सैन्याचे सामर्थ्य

**पुणे (दै. संध्या)**

स्नायपर एमके १, एयर डिफेन्स गन, अँटी मटेरियल रायफल (विध्वंसक), एके ४७ रायफल, एमएमजी गन, टियर गॅस गन यांसह ड्रोन, आर्टिलरी अम्युनिशन, एरियल बॉम्ब अशा देशाच्या संरक्षण सज्जतेला बळकटी देणाऱ्या अभेद्य शस्त्रांना पाहण्याची संधी पुणेकरांना मिळाली. प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून आयोजित प्रदर्शनात भारतीय पायदळ, नौदल, हवाई दलासाठी लागणारी शस्त्रास्त्रे, दारुगोळा यांसह विविध प्रकारची युद्धसज्जतेसाठी आवश्यक असलेल्या साधनांची मॉडेल्स देखील ठेवण्यात आली आहेत.

श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, सुवर्णयुग तरुण मंडळाच्या वतीने प्रजासत्ताक दिनानिमित्त भारतीय बनावटीच्या शस्त्रांचे प्रदर्शन बुधवार पेठेतील लक्ष्मीबाई दगडूशेठ हलवाई दत्तमंदिरासमोर जय गणेश प्रांगण येथे आयोजित करण्यात आले आहे. प्रदर्शनाचे उद्घाटन केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या हस्ते झाले. उद्घाटनप्रसंगी आमदार व ट्रस्टचे सरचिटणीस हेमंत रासने, म्युनिशन्स इंडिया लिमिटेड चे मुख्य महाव्यवस्थापक अरुण ठाकूर, कर्नल बद्रीदत्त गनोला, ट्रस्टचे अध्यक्ष सुनील रासने, कोषाध्यक्ष महेश सूर्यवंशी, सुवर्णयुग तरुण मंडळाचे अध्यक्ष प्रकाश चव्हाण, यतीश रासने, सौरभ रायकर, मंगेश सूर्यवंशी, सचिन आखाडे, अजय मोझर, रुणाल केसरकर, अंकुश रासने यांसह लष्करातील माजी अधिकारी, स्थानिक नगरसेवक आदी उपस्थित होते.

ट्रस्टचे अध्यक्ष सुनील रासने म्हणाले, भारत सरकार रक्षा मंत्रालयाचा उपक्रम असलेल्या म्युनिशन्स इंडिया लिमिटेड ने पुण्यात साकारलेली आणि भारतासह विविध देशांत निर्यात केली जाणारी भारतीय बनावटीची शस्त्रास्त्रे पाहण्याची संधी पुणेकरांना मिळत आहे. दि. २६ जानेवारी २०२६ पर्यंत सकाळी १० ते रात्री १० यावेळेत हे प्रदर्शन पुणेकरांना पाहता येणार आहे. सैन्यदलातील जवान या प्रदर्शनाच्या नियोजनात सहभागी असून पुणेकरांनी प्रत्येक शस्त्राविषयी माहिती देखील तात्काळ घेता येत आहे. ग्रेनेड, लढाऊ विमानातील बॉम्ब, रॉकेटचे विविध प्रकार, तोफांकरीता लागणारा दारुगोळा, विविध प्रकारचे ड्रोन, मल्टी बॅरेल लॉन्च सिस्टिम, बुलेटस्, हँड ग्रेनेड, अँटि सम्बरिन रॉकेट, एरियल बॉम्ब यांसह विविध प्रकारची शस्त्रास्त्रे पाहण्याची संधी मिळत आहे. आत्मनिर्भर, बलशाली व विश्वगुरू भारत साकारण्याकरिता संपूर्ण देशात शस्त्रास्त्रे पुरविण्यासाठी पुण्यातील म्युनिशन्स इंडिया लिमिटेड कार्यरत असून त्यांच्या सहकार्याने प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. प्रदर्शनाला प्रवेश विनामूल्य असून शालेय विद्यार्थी, महाविद्यालयीन विद्यार्थी यांसह पुणेकरांनी मोठया संख्येने भेट द्यावी, असे आवाहन ट्रस्टतर्फे करण्यात आले आहे.



श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, सुवर्णयुग तरुण मंडळाच्या वतीने प्रजासत्ताक दिनानिमित्त भारतीय बनावटीच्या शस्त्रांचे प्रदर्शन बुधवार पेठेतील लक्ष्मीबाई दगडूशेठ हलवाई दत्तमंदिरासमोर जय गणेश प्रांगण येथे आयोजित करण्यात आले आहे.

## थकीत पाणी देयके वेळेत न भरल्यास कारवाई


**ठाणे:**–निवडणूक कामकाजातून मुक्त होताच ठाणे महापालिकेच्या प्रशासनाने कर वसुलीवर भर देण्यास सुरूवात केली आहे. या कर वसुलीसाठी पालिकेने विशेष सवलती यापूर्वी दिल्या असल्या, तरी त्यानंतरही थकीत कर भरण्यास नकार देणाऱ्या नागरिकांच्या नळजोडण्या खंडित करण्याची कारवाई प्रशासनाने सुरू केली आहे. या कारवाईत थकबाकीदारांच्या नळजोडण्या खंडित करणे आणि मीटर रुमला टाळे लावण्याची कारवाई करण्यात येत आहे.

यंदा पाणीपुरवठा विभागाला २५० कोटींचे उद्दिष्ट आखून देण्यात आले असून, ते पार करण्यासाठी विभागाकडून विशेष मोहीम राबवण्यात येत होती. परंतु, गेल्या दोन महिन्यांपासून पालिकेची यंत्रणा निवडणूक कामकाजात व्यस्त झाली होती. त्यामुळे कर वसुलीचा वेग मंदावल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात येत आहे. त्यामुळे निवडणूक कामकाजातून मुक्त होताच, पालिका प्रशासनाने कर वसुलीवर भर देण्यास सुरुवात केली आहे. यात थकीत कर भरण्यास नकार देणाऱ्या नागरिकांच्या नळजोडण्या खंडित करण्याची कारवाई सुरू केली आहे.

## थोडक्यात पण महत्त्वाचे

### कै. अण्णासाहेब मगर हॉस्पिटलमध्ये कोट्यवधींची साधने धूळखात


**हडपसर :**– पुणे महानगरपालिका आणि राज्य सरकार आरोग्य व्यवस्थेच्या नावाखाली नेमके काय करत आहेत? हडपसरमधील अण्णासाहेब मगर हॉस्पिटलमधील विदारक वास्तव पाहता हा प्रश्न आता थेट जनतेकडून उपस्थित केला जात आहे. कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च करून उभारलेले हॉस्पिटल आज प्रशासनाच्या ढिसाळ, बेजबाबदार आणि भ्रष्ट कारभारामुळे अक्षरशः निष्प्रभ झाले असून, याची संपूर्ण जबाबदारी पुणे महानगरपालिका प्रशासन आणि राज्य सरकारची असल्याचा आरोप जोर धरू लागला आहे.



हॉस्पिटलमध्ये ५० ते ६० बेड वापराशिवाय धूळ खात पडून आहेत. रुग्णांना मात्र बेड उपलब्ध नाही असे सांगत ताटकळत ठेवले जाते किंवा अन्यत्र पाठवले जाते. याहूनही गंभीर बाब म्हणजे पूर्णपणे चालू स्थितीतील एक्स–रे मशिन भंगारात टाकण्यात आले असून, रुग्णांना खासगी तपासणीसाठी बाहेर पाठवले जात आहे. त्याचबरोबर कोट्यवधी रुपये खर्चून उभारलेला ऑक्सिजन प्लांट निष्क्रिय अवस्थेत पडून असल्याने कोरोनासारख्या संकटातून काहीही धडा प्रशासनाने घेतला नसल्याचे स्पष्ट होते. अण्णासाहेब मगर हॉस्पिटल हे हडपसर परिसरात प्रसूतीगृह म्हणून ओळखले जाते, मात्र प्रत्यक्षात येथे एकही प्रसूती केली जात नसल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. गरोदर महिलांना क्षुल्लक कारणे पुढे करून थेट ससून रुग्णालयात धाडले जाते. आधीच आर्थिक, मानसिक तणावात असलेल्या महिलांवर हा अमानुष अन्याय असून, पुणे महानगरपालिकेची ही आरोग्यविषयक धोरणे की जनतेची थट्टा, असा सवाल उपस्थित होत आहे. हॉस्पिटलमधील कर्मचारी आपल्या मर्जीप्रमाणे ये–जा करत असून कामाच्या वेळेची कोणतीही नोंद ठेवली जात नाही. वरिष्ठ अधिकाऱ्यांचे नियंत्रण शून्य आहे. या सर्व प्रकाराला पुणे महानगरपालिका प्रशासनाची मूक संमती आहे का, असा संतप्त प्रश्न नागरिक विचारत आहेत.

हा संपूर्ण गलथान आणि धक्कादायक प्रकार पब्लिक आस्क फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष विजय मोरे यांनी माहितीच्या अधिकाराअंतर्गत उघडकीस आणला. यावेळी शहीद भगतसिंग प्रतिष्ठानच्या संस्थापिका सौ. नलिनी मोरे, स्वाभिमानी महिला सुरक्षा संस्थेच्या संस्थापिका व अध्यक्षा सौ. पल्लवी सुरसे–जगताप, माहिती अधिकार कार्यकर्ते तानाजी घोलप यांच्यासह अनेक सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.

### नवी मुंबई महापालिकेचा डिजिटल विस्तार



**मुंबई :**– नागरिकांना महापालिकेशी संबंधित सेवा अधिक सुलभ, जलद आणि पारदर्शकपणे उपलब्ध करून देण्यासाठी नवी मुंबई महापालिकेने डिजिटल सेवांचा विस्तार केला आहे. सध्या पालिकेच्या ६८ सेवा थेट ऑनलाइन उपलब्ध करून देण्यात आल्या असून, यासोबतच आणखी ४९ इतर सेवा डिजिटल माध्यमातून सुरू करण्यात आल्या आहेत. त्यामुळे एकूण ११७ सेवा नागरिकांसाठी 'एका क्लिकवर' उपलब्ध झाल्या आहेत.

नागरिकांना विविध कामांसाठी वारंवार पालिका कार्यालयात येण्याची गरज पडू नये, या उद्देशाने हा उपक्रम राबवण्यात येत आहे. आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी याकडे विशेष लक्ष दिले आहे. नागरिक http://www.nmmc.gov.in या अधिकृत संकेतस्थळावरून, तसेच 'माझी नवी मुंबई My NMMC' या मोबाइल ॲपच्या माध्यमातून या सेवांचा लाभ घेऊ शकतात.

रुग्णालयात होणाऱ्या जन्म व मृत्यूच्या घटनांची नोंद संबंधित रुग्णालयांनी पालिकेकडे ऑनलाइन करणे बंधनकारक करण्यात आले आहे. यासाठी https://dc.crsorgi.gov.in या विशेष संगणक प्रणालीचा वापर केला जात असून, नोंदणी करताना आवश्यक कागदपत्रे अपलोड करणे, तसेच संबंधित व्यक्तीचा ई–मेल आयडी व मोबाइल क्रमांक नोंदवणे अनिवार्य आहे. रुग्णालयांकडून प्राप्त झालेल्या ऑनलाइन अर्जांची संबंधित विभाग कार्यालय स्तरावर छाननी केली जाते. त्यानंतर विहित शुल्क आकारून तीन दिवसांत जन्म किंवा मृत्यू प्रमाणपत्र वितरित करण्यात येते. जानेवारी ते डिसेंबर २०२५ या कालावधीत एकूण १६९०२ जन्म प्रमाणपत्रांचे ऑनलाइन वितरण करण्यात आले असून, ही सर्व प्रमाणपत्रे शासनाने ठरवून दिलेल्या कालमर्यादेत दिल्याची माहिती पालिकेने दिली.

## संजय राऊतांना कॅन्सरचं निदान, स्वत: मुलाखतीत दिली मोठी माहिती

**मुंबई (दै. संध्या)**



शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे डॅशिंग खासदार संजय राऊत हे गेल्या काही महिन्यांपासून आजारी आहेत. गेल्या वर्षी दिवाळीत त्यांना गंभीर आजाराचं निदान झालं होतं. संजय राऊत यांनी स्वत: ट्विट करत याबाबत माहिती दिली होती. आपल्याला फार गंभीर आजाराचं लागण झाल्याची माहिती स्वत: खासदार संजय राऊत यांनी दिली होती. त्यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मनसे अध्यक्ष राज ठाकरे, शिवसेना उबाठा पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी संजय राऊतांच्या प्रकृतीची विचारपूस केल्याची माहिती समोर आली होती. पण संजय राऊत यांना नेमकं कोणत्या आजाराने ग्रासले आहे? याची माहिती समोर आली नव्हती. त्यांच्या कार्यकर्ते, चाहत्यांमध्ये आणि समर्थकांमध्ये चिंतेची लाट पसरली होती. पण हार मानतील ते राऊत कुठे? संजय राऊत यांनी या आजारावर बऱ्यापैकी मात मिळवत पुन्हा कमबॅक केलं. संजय राऊत यांनी आता स्वत: आपल्याला झालेल्या आजाराची माहिती दिली आहे. संजय राऊत यांच्यावर शस्त्रक्रिया करण्यात आल्याची माहिती समोर आली होती. तसेच त्यांच्यावर रुग्णालयात काही दिवस उपचार देखील करण्यात आल्याची माहिती समोर आली होती. यानंतर संजय राऊत यांचा चेहऱ्यावर मास्क असलेला फोटो समोर आला होता. पण संजय राऊत यांना नेमकं कोणत्या आजाराने ग्रासलं आहे? ते सर्वसामान्य जनतेला माहिती नव्हतं. पण आता स्वत: संजय राऊत यांनी 'एबीपी माझा'ला दिलेल्या मुलाखतीत आपल्या आजारपणावर भाष्य केलं आहे. अनेकांना ज्या आजाराची शंका होती त्याच आजाराचं निदान संजय राऊत यांना झाल्याचं स्पष्ट झालं आहे. संजय राऊत यांनी सविस्तर याबाबत माहिती दिली. संजय राऊत यांनी मुलाखतीत सत्ताधारी भाजप आणि शिवसेना पक्षांवर सडकून टीका केली. यावेळी संजय राऊत यांना राजकारण वगळता वैयक्तिक आयुष्यातील लढाईबाबत प्रश्न विचारण्यात आला. त्यावर संजय राऊत यांनी महत्त्वाची माहिती दिली. नाही, मला कॅन्सर झाला ना? त्यात काय? दिवाळीच्या दोन–चार दिवस आधी कॅन्सरचं निदान झालं. माझे भाऊ आमदार सुनील राऊत यांनी माझं रक्त चेक केलं. त्यातून ते निष्पन्न झालं की, मला पोटात कॅन्सर आहे. त्यातून आता मी बाहेर यायचा प्रयत्न करतोय. मला जेव्हा जेव्हा शक्य झालं तेव्हा मी बाहेर आलो. उभा राहिलो. अजून काही उपचार सुरु आहेत. काही सर्जरी व्हायच्या आहेत. पण त्या होतील. एवढ्या सर्जरी आपणही करतो. हे आपल्या शरीरातील सर्जरी आहे, अशी महत्त्वाची प्रतिक्रिया संजय राऊत यांनी दिली आहे.

## जिल्हा परिषद निवडणुकांसाठी काँग्रेसच्या ४० स्टार प्रचारकांची यादी जाहीर

**मुंबई (दै. संध्या)**

राज्यातील १२ जिल्हा परिषद व १२५ पंचायत समिती निवडणुकीसाठी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीने ४० स्टार प्रचारकांची यादी जाहीर केली आहे. काँग्रेसच्या स्टार प्रचारकांच्या यादीत महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्नीथला, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, विधिमंडळ पक्षनेते आ. विजय वडेट्टीवार, खासदार छत्रपती शाहू महाराज, विधान परिषदेतील गटनेते आ. सतेज ऊर्फ बंटी पाटील, अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस खा. मुकुल वासनिक, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, काँग्रेस कार्य समितीचे सदस्य बाळासाहेब थोरात, खासदार रजनीताई पाटील, गोव्याचे प्रभारी माणिकराव ठाकरे, माजी प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, अल्पसंख्याक विभागाचे राष्ट्रीय अध्यक्ष व राज्यसभा खासदार इम्रान प्रतापगढी, राज्यसभा खासदार चंद्रकांत हंडोरे, अखिल भारतीय कार्य समितीचे सदस्य नसीम खान, अखिल भारतीय कार्य समितीच्या सदस्या यशोमती ठाकूर, खासदार प्रणिती शिंदे, आमदार अमिन पटेल, माजी मंत्री डॉ. नितीन राऊत, आ. अमित देशमुख, आ. डॉ. विश्वजित कदम, अनिस अहमद, माजी मंत्री रमेश बागवे, माजी खा. हुसेन दलवाई, आ. साजिद खान पठाण, माजी मंत्री वसंत पुरके, माजी आमदार धिरज देशमुख, रामहरी रुपनवर, एम. एम. शेख, अल्पसंख्याक विभागाचे अध्यक्ष वजाहत मिर्झा, वरिष्ठ प्रवक्ते अतुल लोंढे, प्रदेश उपाध्यक्ष सिद्धार्थ हत्तीअंबिरे, ओबीसी विभागाचे प्रदेशाध्यक्ष यशपाल भिंगे, मुफ्ती हारुन नदवी, शाह आलम शेख, महिला काँग्रेस प्रदेशाध्यक्ष संध्याताई सव्वालाखे, युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष शिवराज मोरे, सेवादलाचे प्रदेशाध्यक्ष विलास औताडे, एनएसयुआयचे प्रदेशाध्यक्ष सागर साळुंखे, अक्षय राऊत व हनुमंत पवार यांचा या यादीत समावेश आहे.

## बाळासाहेबांच्या जन्मशताब्दीनिमित्त शिवसेनेचे राज्यभरात लोकोपयोगी उपक्रम

### शिवसेना मुख्य नेते व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची घोषणा

हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दीनिमित्त शिवसेनेकडून 'आरोग्य आपल्या दारी', गडकोट स्वच्छता मोहीम, 'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे नागरी लोककल्याण अभियान' यासह अनेक लोकोपयोगी उपक्रमांची घोषणा शिवसेना मुख्य नेते व राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज केली. बाळासाहेब भवन येथे आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी मंत्री प्रताप सरनाईक, मंत्री उदय सामंत, विधान परिषद उपसभापती डॉ. निलम गोऱ्हे, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अध्यक्ष सिद्धेश कदम, शिवसेना सरचिटणीस राहुल शेवाळे, उपनेत्या शीतल म्हात्रे व इतर प्रमुख नेते उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, बाळासाहेबांच्या जन्मशताब्दी निमित्त मुंबई महापालिकेच्या वतीने 'बाळासाहेब ठाकरे आरोग्य आपल्या दारी' अभियानाच्या माध्यमातून घरोघरी आरोग्य तपासणी मोहीम सुरु केली जाईल. सुरुवातीला मुंबईत आणि त्यानंतर उर्वरित महाराष्ट्रात हे अभियान राबवू, अशी माहिती उपमुख्यमंत्री शिंदे यांनी दिली. मुंबई महापालिका रुग्णालयांमध्ये रुग्णांना झीरो प्रिस्क्रिप्शन आणि कॅशलेस सुविधा उपलब्ध केली जाणार आहे.

प्रदूषण नियामक मंडळाच्या माध्यमातून राज्यात 'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे गडकोट किल्ले स्वच्छता मोहीम' राबवली जाणार आहे. या गडकोटांवर आरओ फिल्टर बसवले जातील, तसेच प्लास्टिक मुक्त गडकोट किल्ले अशी मोहीम हाती घेतली जाणार आहे. युनेस्कोने समावेश केलेल्या जागतिक वारसा यादीतील ११ किल्ल्यापासून ही मोहीम सुरु होईल. यात सहभागी होणाऱ्या शिवभक्तांना आणि संस्थांना १ लाख रुपये मानधन दिले जाणार आहे.

ते पुढे म्हणाले की, आरोग्य, शिक्षण याबरोबरच ज्येष्ठांसाठी एसटी संगे तिर्थाटन योजना, महिला बचत गटांच्या सक्षमीकरणासाठी १०० कोटी, मराठी भाषा संवर्धनासाठी १०० कोटी, रस्ता सुरक्षा मोहीमेसाठी १०० कोटीची तरतूद केली आहे. तसेच १० हजार विद्यार्थीनींना स्वसंरक्षणाचे धडे, शालेय शिक्षण विभागाकडून निबंध, वक्तृत्व, चित्रकला, व्यंगचित्रकला स्पर्धांचे आयोजन केले जाईल. झोपडपट्टीमुक्त मुंबईचे बाळासाहेबांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी म्हाडा, सिडको, एमएमआरडीए सारख्या संस्थांच्या माध्यमातून काम सुरु झाले आहे. ४० लाख मुंबईकरांना हक्काचे घर देणार आहोत, असे ते म्हणाले.

## ज्ञानमंदिर कळंबोली शाळेने पटकवले 'मएसो क्रीडा करंडक २०२६'चे विजेतेपद

- बालशिक्षण मंदिर इंग्लिश मीडियम कोथरूड येथे आयोजित स्पर्धेची सांगता
- आंतरराष्ट्रीय महिला क्रिकेटपटू तेजल हसबनीस यांच्या हस्ते बक्षीस वितरण

**पुणे (दै. संध्या)**



महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या (मएसो) क्रीडावर्धिनी आणि कोथरूड येथील बालशिक्षण मंदिर इंग्लिश मिडीयम स्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'मएसो क्रीडा करंडक २०२६' या राज्यस्तरीय आंतरशालेय क्रीडा स्पर्धेचे सर्वसाधारण विजेतेपद मएसो ज्ञानमंदिर कळंबोली या शाळेने पटकवले. यासह ही फिरता करंडकाचीही मानकरी ठरली. या स्पर्धेचे हे १४ वे वर्ष होते.

प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांसाठी ही तीन दिवसीय निवासी क्रीडा स्पर्धा बालशिक्षण मंदिर इंग्लिश मिडीयम स्कूल, मयूर कॉलनी कोथरूड येथे पार पडली. आंतरराष्ट्रीय महिला क्रिकेटपटू तेजल हसबनीस यांच्या हस्ते स्पर्धेचे बक्षीस वितरण रविवारी झाले. प्रसंगी 'मएसो'चे उपाध्यक्ष प्रदीप नाईक कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. यावेळी 'मएसो'च्या नियामक मंडळाचे अध्यक्ष बाबासाहेब शिंदे, क्रीडावर्धिनी व शाला समितीचे अध्यक्ष विजय भालेराव, 'मएसो'चे सचिव अतुल कुलकर्णी, सहसचिव सुधीर भोसले, शाला समिती महामात्र डॉ. नेहा देशपांडे, मुख्याध्यापिका अदिती कुलकर्णी, मंजुषा दुर्वे, सायली देशमुख यांच्यासह संस्थेचे व शाळेचे पदाधिकारी उपस्थित होते.

तेजल हसबनीस म्हणाल्या, विद्यार्थ्यांमध्ये लहान वयापासून क्रीडासंस्कृती रुजविण्यासाठी अशा स्पर्धा महत्वाच्या असतात. त्यांच्यात संघभावना, शिस्त, प्रामाणिकपणा, आत्मविश्वास आणि खेळाडूवृत्ती विकसित होते. चांगला माणूस होण्यासाठी खेळांतून प्रोत्साहन मिळते.

प्रदीप नाईक यांनी अध्यक्षीय मनोगतात सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. भविष्यात तुमच्यातील काही विद्यार्थी ऑलिम्पिकमध्येही भारताचे प्रतिनिधित्व करतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. पुढील वर्षीचा 'मएसो क्रीडा करंडक' पनवेल येथील आद्यक्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके महाविद्यालय येथे आयोजिला जाणार असल्याचे विजय भालेराव यांनी घोषित केले.

बाबासाहेब शिंदे यांनी स्वागत–प्रास्ताविक केले. डॉ. वैशाली कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले. मंजुषा दुर्वे यांनी आभार मानले. संस्थेच्या पदाधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनात शाळेच्या सर्व शिक्षिका, क्रीडाशिक्षक यांनी क्रीडास्पर्धा यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी विशेष परिश्रम घेतले.

## प्रजासत्ताक दिनानिमित्त आज राज्यभरात सांस्कृतिक कार्यक्रम

**मुंबई :**– राज्य शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागामार्फत प्रजासत्ताक दिनानिमित्त सहा महसुली विभागांत गीत, नृत्य, नाट्याच्या सादरीकरणातून देशभक्तीपर सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे.

वंदे मातरम् या देशभक्तीपर गीत व नृत्याविष्काराच्या सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन सोमवारी (२६ जानेवारी) रात्रौ सव्वाआठला रवींद्र नाट्यमंदिरात करण्यात आले आहे. सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार व सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली 'वंदे मातरम्' हा कार्यक्रम होणार आहे.

या कार्यक्रमात गायक राहुल जेठे, गायिका प्रिया पवार आणि भाग्यश्री अभ्यंकर व समूह, तसेच नृत्याविष्कार : फ्युजन इंस्टिट्यूट ऑफ डान्स समूहाचा सहभाग असून, प्रवेश विनामूल्य आहे. जास्तीत जास्त प्रेक्षकांनी या कार्यक्रमाचा आनंद घ्यावा, असे आवाहन संचालक बिभीषण चवरे यांनी केले आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...




### पुणे विमानतळावर बॉम्बची चिठ्ठी सापडल्याने खळबळ! प्रजासत्ताक दिनापूर्वी हाय अलर्ट

पुणे : दिल्ली येथून आलेल्या विमानात बॉम्ब ठेवल्याची चिठ्ठी विमानात सापडली होती, त्यानंतर विमानतळावर गोंधळ उडाला. सीआयएसएफकडून विमानाची तपासणी करण्यात आल्यानंतर कोणतीही संशयास्पद वस्तू आढळली नाही. मात्र, या अफवेमुळे प्रजासत्ताक दिनाच्या पार्श्वभूमीवर पुणे विमानतळावरील सुरक्षा व्यवस्था केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलाकडून (सीआयएसएफ) कडक करण्यात आली आहे. बंदोबस्त वाढविण्यात आला असून क्विक रिऍक्शन टीम (क्यूआरटी) कार्यान्वित केली आहे. विमानतळाच्या सुरक्षेच्या दृष्टीने ३० जानेवारी २०२६ पर्यंत सर्व उड्डाणांसाठी १०० टक्के सेकंडरी लॅडर पॉइंट चेकिंग (एसएलपीसी) सक्तीचे करण्यात आले आहे. उड्डाणापूर्वी आणि आगमनानंतर अतिरिक्त तपासणी केली जाणार आहे. विमानतळ परिसरात गस्त वाढविण्यात आली आहे. विमानतळाकडे येणाऱ्या सर्व प्रमुख मार्गांवर नाकाबंदी करून वाहनांची व प्रवाशांची कसून तपासणी केली जात आहे. संशयास्पद हालचालींवर विशेष लक्ष ठेवले जात आहे.विमानतळ परिसरातील सीसीटीव्ही व इतर देखरेख यंत्रणांची कार्यक्षमता वाढविण्यात आली आहे. कार्गो टर्मिनलवरील सुरक्षा व्यवस्थाही अधिक मजबूत करण्यात आली आहे. ग्राउंड हँडलिंग कर्मचारी आणि इतर विमानतळ कर्मचाऱ्यांच्या हालचालींवर बारकाईने नजर असणार आहे. प्रवेश नियंत्रण अधिक कडक केले गेले आहे. या पार्श्वभूमीवर सर्व संबंधित यंत्रणांची विशेष समन्वय बैठक घेण्यात आली. या बैठकीत प्रवासी, विमाने आणि विमानतळाची पायाभूत सुविधा सुरक्षित ठेवण्यासाठी सर्वांनी अधिक सतर्क राहून आवश्यक त्या प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.



### रावेत परिसरात जलवाहिनीला गळती; शहरातील अनेक भागांचा पाणीपुरवठा खंडित होणार

पिंपरी : पिंपरी-चिंचवड महानगरपालिका हद्दीतील रावेत परिसरात मुख्य अशुद्ध पाण्याच्या (रॉ वॉटर) जलवाहिनीला गळती आढळून आली आहे. या गळतीमुळे शहराच्या पाणीपुरवठा व्यवस्थेवर परिणाम झाला असून पाणीपुरवठा विभागाकडून तातडीने दुरुस्तीचे काम हाती घेण्यात आले आहे. सदर गळती दुरुस्तीचे काम आज सायंकाळपर्यंत पूर्ण करण्यात येणार असल्याची माहिती पाणीपुरवठा विभागाकडून देण्यात आली आहे. मात्र, या कामामुळे पिंपरी-चिंचवड शहरातील अनेक भागांमध्ये आज संध्याकाळचा पाणीपुरवठा पूर्णपणे खंडित राहणार असून काही भागांमध्ये कमी दाबाने पाणीपुरवठा होण्याची शक्यता आहे. तसेच, उद्या देखील काही परिसरात कमी दाबाने पाणीपुरवठा होऊ शकतो, अशी शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. त्यामुळे शहरातील नागरिकांनी उपलब्ध पाण्याचा योग्य आणि काटकसरीने वापर करावा, असे आवाहन पाणीपुरवठा विभागाचे सह शहर अभियंता अजय सूर्यवंशी यांनी केले आहे.

### १४ वर्षाखालील क्रिकेट स्पर्धेसाठी अभिनव देसाई याची महाराष्ट्र संघात निवड

पिंपरी : गुजरात येथे होणाऱ्या १४ वर्षाखालील क्रिकेट स्पर्धेसाठी अभिनव देसाई याची महाराष्ट्र राज्य संघात निवड झाल्याने पिंपरी-चिंचवड शहराच्या क्रीडा क्षेत्रात आनंदाचे वातावरण आहे.

या उल्लेखनीय यशाबद्दल पिंपरी-चिंचवड शहर क्रिकेट असोसिएशनच्या वतीने उपाध्यक्ष योगेश बहल यांच्या हस्ते अभिनव देसाई याचा सत्कार करण्यात आला. यावेळी डॉ. दिलीप सिंह मोहिते, खजिनदार संजय शिंदे, सचिव राजू कोतवाल तसेच अभिनवचे वडील विनोद देसाई उपस्थित होते. सत्कारप्रसंगी उपाध्यक्ष योगेश बहल यांनी अभिनवच्या पुढील क्रीडा वाटचालीस शुभेच्छा देत त्याच्या उज्ज्वल भवितव्याबद्दल विश्वास व्यक्त केला. अभिनव देसाई हा पिंपरी-चिंचवड शहर क्रिकेट असोसिएशनच्या अकॅडमीत नियमित सराव करत असून, क्रिकेट प्रशिक्षक राजू कोतवाल व सुनील कोतवाल यांच्या मार्गदर्शनाखाली तो आपले कौशल्य अधिक विकसित करत आहे. अभिनवच्या या यशाबद्दल क्रीडा प्रेमींनी तसेच असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांनी त्याचे अभिनंदन केले आहे.

### किरकोळ कारणावरून वाद.. पतीने पत्नीवर केला चाकूने वार

चिखली : चिखली परिसरात पतीने आपल्या पत्नीवर भाजी कापण्याच्या सुरीने वार करून तिला जखमी केले. ही घटना गुरुवारी (२२ जानेवारी) रोजी रात्री नेवाळे वस्ती, चिखली येथे घडली. या प्रकरणात पीडित महिलेने चिखली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. आरोपी सुनील बालाजी गोरे (३८, नेवाळे वस्ती, चिखली) याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी आणि आरोपी हे पती-पत्नी आहेत. आरोपी फिर्यादीशी जवळीक साधण्याचा प्रयत्न करत असताना फिर्यादीने त्यांना बाजूला केले. याचा राग आल्याने आरोपीने पत्नीला शिवीगाळ करत मारहाण केली आणि घरातील भाजी कापण्याच्या सुरीने त्यांच्या हाताच्या बोटावर वार करून जखमी केले. चिखली पोलीस तपास करत आहेत.

# आळंदी देवस्थानच्या प्रमुख विश्वस्तपदी भावार्थ देखणे यांची निवड

**आळंदी (दै. संध्या) :**

श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटी, आळंदीच्या विश्वस्त मंडळाची महत्त्वाची बैठक दि.२३ जानेवारी २०२६ रोजी आळंदी येथे संपन्न झाली. या बैठकीत सन २०२६ या वर्षाकरिता प्रमुख विश्वस्त म्हणून डॉ. भावार्थ रामचंद्र देखणे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. या बैठकीस प्रमुख विश्वस्त योगी निरंजननाथ तसेच सर्व विश्वस्त ॲड. राजेंद्र उमाप, श्री चैतन्य महाराज लोंढे कबीरबुवा, श्री पुरुषोत्तम दादा पाटील आणि ॲड. रोहिणीताई पवार उपस्थित होते. सर्व विश्वस्तांच्या सहमतीने हा निर्णय घेण्यात आला.



डॉ. भावार्थ देखणे हे उच्च शिक्षित असून त्यांनी अमेरिकेत शिक्षण पूर्ण केले आहे. त्यांच्याकडे तीन पदव्युत्तर पदव्या असून मॅनेजमेंट विषयात पीएचडी प्राप्त केली आहे. सध्या ते बी. व्ही. जी. इंडिया लिमिटेड या कंपनीमध्ये एच. आर. हेड या पदावर कार्यरत आहेत.

शैक्षणिक आणि व्यावसायिक क्षेत्रासोबतच डॉ. भावार्थ देखणे हे एक प्रसिद्ध भारुडकार, कीर्तनकार, व्याख्याते, निरुपणकार व प्रवचनकार म्हणूनही ओळखले जातात. त्यांनी मराठी तसेच अमराठी लोकांसाठी महाराष्ट्रात, महाराष्ट्राबाहेर व परदेशात इंग्रजी भाषेतही कीर्तने आणि भारुडे सादर केली आहेत. तसेच सन २०२५ च्या संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यात त्यांनी पालखी सोहळा प्रमुख म्हणून यशस्वीपणे कार्य पाहिले होते. संस्थानच्या धार्मिक, सांस्कृतिक व प्रशासकीय व्यवस्थापनात त्यांच्या अनुभवाचा आणि अभ्यासाचा निश्चितच उपयोग होईल, असा विश्वास यावेळी विश्वस्त मंडळाने व्यक्त केला आहे.

# भाजपाने मोठ्या मनाने महापौर पद आरपीआयला द्यावे : कुणाल वाव्हळकर

**पिंपरी (दै. संध्या) :**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका निवडणुकीत रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) गटाने भाजपासोबत बिनशर्त युती करत निवडणूक लढवली होती. केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्या आदेशानुसार आंबेडकरी समाज मोठ्या प्रमाणात भाजपाच्या पाठीशी उभा राहिला. आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्त्यांनी भाजप कार्यकर्त्यांसोबत खांद्याला खांदा लावून प्रचार करत निवडणूक लढवली, त्यामुळेच भाजपाला घवघवीत यश मिळाल्याचे मत आरपीआय (आठवले) शहराध्यक्ष कुणाल वाव्हळकर यांनी व्यक्त केले आहे. महापालिका निवडणुकी दरम्यान भाजपाने आरपीआय (आठवले) गटासाठी पाच जागा सोडल्या होत्या. विशेष बाब म्हणजे या सर्व जागांवर आरपीआयच्या उमेदवारांनी भाजपच्या ङ्गकमळफ चिन्हावर निवडणूक लढवली. त्यापैकी दोन जागांवर आरपीआयचे उमेदवार मोठ्या मताधिक्याने विजयी झाले, तर उर्वरित तीन जागांवर अत्यंत निसटता पराभव स्वीकारावा लागला. महापौर पदासाठी अनुसूचित जाती (एससी) आरक्षण पडेल, अशी अपेक्षा आंबेडकरी समाजाला होती. मात्र यावेळी महापौर पद सर्वसाधारण आरक्षणासाठी राखीव झाल्याने अनेक कार्यकर्त्यांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. सध्या भाजपकडून अनेक इच्छुक महापौर पदासाठी प्रयत्नशील आहेत. मात्र आरपीआय (आठवले) समर्थकांची एकमुखी मागणी आहे की, युतीधर्म जपत महापौर पद आरपीआयला देण्यात यावे अशी भावना कुणाल वाव्हळकर यांनी व्यक्त केली आहे.

# महापौर व उपमहापौर पदाच्या निवडणुकीसाठी ६ फेब्रुवारीला विशेष सभा

## स्थायी समितीसह विविध विशेष समित्यांच्या सदस्यांची देखील केली जाणार नियुक्ती

**पिंपरी (दै. संध्या) :**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या महापौर व उपमहापौर पदाच्या निवडणुकीसाठी शुक्रवार, दि.६ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ११ वाजता महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात विशेष सभा आयोजित करण्यात आली आहे. या सभेत स्थायी समितीसह विविध ५ विशेष समित्यांच्या सदस्यांची देखील नियुक्ती केली जाणार आहे, अशी माहिती आयुक्त श्रावण हर्डीकर यांनी दिली. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे महापौर पद सर्वसाधारण प्रवर्गासाठी आरक्षित झाले आहे. या पदासह उपमहापौर पदाची निवड विशेष सभेत केली जाणार आहे. याबाबत पुणे विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत



पुलकुंडवार यांच्या स्वाक्षरीने आदेश जारी करण्यात आले आहेत. या सभेचे पिठासीन अधिकारी म्हणून विभागीय आयुक्तांचे प्रतिनिधी म्हणून सहकार आयुक्त दिपक तावरे काम पाहणार आहेत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार महापौर व उपमहापौर पदाच्या निवडीसाठी विशेष सभा बोलावली जाते. यानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची विशेष सभा ६ फेब्रुवारी २०२६ रोजी होणार आहे. या सभेत महापौर व उपमहापौर यांच्यासह स्थायी समिती व विविध ५ विशेष समितीच्या सदस्यांची नियुक्ती केली जाणार आहे.

महापौर व उपमहापौर पदासाठी नामनिर्देशन पत्राचे छापील फॉर्म्स महानगरपालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमधील तिसऱ्या मजल्यावर असणाऱ्या नगरसचिव कार्यालयात कार्यालयीन वेळेत मिळतील. नामनिर्देशन पत्र दाखल करण्याकरिता सोमवार, दि. २ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी ३ ते ५ ही वेळ निश्चित करण्यात आली आहे. नामनिर्देशन पत्र नगरसचिव कार्यालयात विहित वेळेत स्वीकारली जाणार आहेत, असे नगरसचिव मुकेश कोळप यांनी सांगितले.

**स्थायी समितीवर १६ तर विशेष समितीवर ९ सदस्यांची केली जाणार नियुक्ती**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या स्थायी समितीवर १६ सदस्यांची नियुक्ती करण्यात येणार आहे. तसेच विविध ५ विशेष समित्यांवर प्रत्येकी ९ सदस्यांची निवड देखील ६ फेब्रुवारी रोजी आयोजित विशेष सभेत करण्यात येणार आहे. विशेष समितीवर सदस्यांच्या नियुक्ती करताना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार पक्षांच्या किंवा गटाच्या प्रमाणात प्रतिनिधित्व देण्यात येणार आहे. महिला व बालकल्याण समितीवर कमीतकमी ७५ टक्के सदस्य महिला सदस्यांमधून नियुक्त केले जाणार आहेत, अशी माहिती नगरसचिव मुकेश कोळप यांनी दिली.

# दंड भरू, पण सवय बदलणार नाही !

## अस्वच्छ पुणेकरांनी वर्षभरात दंड म्हणून भरले ३.७७ कोटी

**पुणे (दै. संध्या) :**

महापालिकेकडून शहर स्वच्छतेसाठी जनजागृती केली जात असतानाच, सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता करणाऱ्या पुणेकरांची संख्या वाढत आहे. १ जानेवारी २०२५ ते ३१ डिसेंबर २०२५ या कालावधीत महापालिकेकडून शहरात अस्वच्छता करण्यास जबाबदार असलेल्या ५३ हजार ३९३ पुणेकरांवर कारवाई करीत त्यांच्याकडून तब्बल ३ कोटी ७७ लाख ५० हजार ३५२ रुपयांचा दंड वसूल केला आहे.

यामध्ये सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता करणाऱ्या ३८ हजार ३०४ नागरिकांकडून सर्वाधिक २ कोटी १७ लाख २० हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे. महापालिकेच्या या कारवाईत रस्त्याकडेला थुंकणे, लघवी करणे, सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकणे, अस्वच्छता करणे अशा वेगवेगळ्या १३ प्रकारच्या बाबींवर कारवाई करण्यात येते.

**पुणे घनकचरा**

महापालिकेकडून १५ क्षेत्रीय कार्यालयांसाठी स्वतंत्र १५ दक्षता पथकांची स्थापना करण्यात आली असून, ही पथके दिवसभर आपल्या-आपल्या क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीत फिरून कारवाई करतात. याशिवाय नागरिकांकडून प्राप्त होणाऱ्या तक्रारींच्या आधारेही संबंधितांवर कारवाई करून दंड वसूल केला जातो.

**जनजागृतीची गरज**

महापालिकेने नेमलेल्या




पथकांकडून शहरातील काही ठराविक भागांतच कारवाई होते, त्यामुळे अशा भागांमध्ये जनजागृती केल्यास अस्वच्छतेला आळा बसू शकतो. विशेष म्हणजे, केंद्र शासनाच्या स्वच्छ भारत अभियानांतर्गत पालिकेकडून जनजागृतीसाठी प्रामुख्याने सार्वजनिक भिंतींवर तसेच रेडिओवर जाहिराती केल्या जातात. मात्र, प्रत्यक्षात सर्वच क्षेत्रीय कार्यालयांत मोठ्या सोसायट्या तसेच वस्ती पातळीवर लक्ष देणे गरजेचे ठरत आहे.

**पुणेकरांनी भरलेला एकूण दंड**

- **सार्वजनिक ठिकाणी थुंकणे** : ८ लाख ४६ हजार
- **रस्त्यावर लघवी करणे** : १६ लाख ९३ हजार १००
- **कचरा जाळणे** : ३ लाख २० हजार
- **कचरा वर्गीकरण न करणे** : १० लाख १८ हजार ७८०
- **अस्वच्छता करणे** : २ कोटी १७ लाख २० हजार
- **बल्क वेस्ट जनरेटर दंड** : ५ लाख ८३ हजार
- **बांधकाम राडारोडा** : ३७ लाख २८ हजार
- **प्लास्टिक विक्री** : ७१ लाख १० हजार

# पुणे जिल्ह्याच्या सुपुत्राला उल्लेखनीय सेवेबद्दल राष्ट्रपती पदक

## अविनाश शिळीमकर यांचा सन्मान



**पिंपरी (दै. संध्या) :**

पुणे जिल्ह्याच्या पोलीस दलाने देशपातळीवर पुन्हा एकदा आपली छाप पाडली आहे. पुणे ग्रामीण गुन्हे शाखेत कार्यरत असलेले वरिष्ठ पोलीस निरीक्षक अविनाश शिळीमकर यांना त्यांच्या उल्लेखनीय, कर्तव्यनिष्ठ आणि प्रभावी सेवेसाठी राष्ट्रपती पदक जाहीर झाले आहे. प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला केंद्रीय गृह मंत्रालयाकडून पोलीस पदकांची घोषणा करण्यात आली.

भोर तालुक्यातील तांबड, गुंजन मावळ हे शिळीमकर यांचे मूळ गाव आहे. त्यांनी प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषद शाळेत पूर्ण केले, तर पदवी शिक्षण पुण्यातील सर परशुरामभाऊ महाविद्यालयातून घेतले. सन १९९३ मध्ये त्यांनी पोलीस दलात उपनिरीक्षक म्हणून कारकिर्दीची सुरुवात केली. मुंबईतील येलो गेट, वडाळा आणि एल. टी. मार्ग पोलीस ठाण्यांतून त्यांनी सेवा बजावली.

यानंतर मुंबई शहर, सातारा, नागपूर शहर गुन्हे शाखा, अहिल्यानगर विशेष शाखा आणि सध्या पुणे ग्रामीण गुन्हे शाखा अशा विविध ठिकाणी त्यांनी प्रभावी कामगिरी केली आहे. त्यांचा एकूण सेवाकाल तब्बल ३२ वर्षांचा आहे.

सेवाकाळात त्यांनी अनेक कुख्यात गुन्हेगार टोळ्यांना जेरबंद करत महत्त्वपूर्ण यश मिळवले. पुणे ग्रामीणमध्ये कार्यरत असताना ऊरुळी कांचन परिसरातील कुख्यात आप्पा लोंढे टोळीवर कारवाई करून परिसरातील गुन्हेगारीवर आळा घातला.

नागपूर शहरात कार्यरत असताना खून, दरोडा, खंडणीसह तब्बल ३८ गंभीर गुन्हे उघडकीस आणत कुख्यात राजा गौस टोळीचा पर्दाफाश केला. तसेच संतोष आंबेकर टोळीवर कारवाई करून नागपूर शहरातील दहशत संपुष्टात आणण्यात त्यांनी मोलाचा वाटा उचलला.

अहिल्यानगर जिल्ह्यात शेतकऱ्यांच्या जनावरांच्या व शेतीमाल चोरीप्रकरणी स्वतः मैदानात उतरून सराईत टोळ्यांचा छडा लावत चोरीचा मुद्देमाल शेतकऱ्यांना परत मिळवून दिला. कोरोना महामारीच्या काळात पुणे ग्रामीण आणि अहिल्यानगर येथे कार्यरत असताना स्थलांतरित मजुरांसाठी विविध उपाययोजना राबविणे, तसेच पोलीस कर्मचाऱ्यांसाठी वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्यात त्यांनी पुढाकार घेतला. नोव्हेंबर २०२२ पासून पुणे ग्रामीण स्थानिक गुन्हे शाखेत वरिष्ठ पोलीस निरीक्षक म्हणून कार्यरत असताना दरोडा, जबरी चोरी, घरफोडी तसेच आंतरराज्यीय गुन्हेगार टोळ्यांवर मोठ्या प्रमाणावर कारवाई करण्यात आली. यवत येथील एका कुटुंबातील सात जणांच्या मृत्यूचा गुन्हा आत्महत्येऐवजी खून असल्याचे सिद्ध करणे, सासवड तहसील कार्यालयातील ईव्हीएम चोरीचा छडा लावणे, तसेच महामार्गावरील लुटमार करणाऱ्या टोळ्यांना जेरबंद करणे ही त्यांची ठळक कामगिरी आहे.

अवैध अग्निशस्त्र व अमली पदार्थ जप्ती, मोक्का व एमपीडीए अंतर्गत कारवाई, दंगल नियंत्रण तसेच निवडणूक काळातील बंदोबस्त आदी सर्वच बाबींमध्ये त्यांनी प्रभावी नेतृत्व दाखवले आहे. त्यांच्या या उत्कृष्ट सेवेसाठी यापूर्वी २०२४ मध्ये त्यांना पोलीस महासंचालक पदकानेही गौरविण्यात आले होते.

कर्तव्यनिष्ठा, प्रामाणिकपणा आणि शिस्तप्रिय स्वभावामुळे अविनाश शिळीमकर हे पोलीस दलातील आदर्श अधिकारी म्हणून ओळखले जातात. राष्ट्रपती पदकाच्या सन्मानामुळे पुणे जिल्ह्याला पुन्हा एकदा गौरव प्राप्त झाला आहे.